मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

www.dainikmahasagar.in Epaper: www.epaper.dainikmahasagar.in

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
५०६, यशवंत सृत टॉवर, स्मार्ट बाजारच्या मागे,
आदिनाथ अपार्टमेंट समोर,विरार प. मोबाईल नं. ९०११०५५४१३

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९४२०६९१४२०

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | गुरुवार, १ जानेवारी २०२६ | वर्ष: १० | अंक: २३९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## कुख्यात गुंड बापू नायरला राष्ट्रवादीचे तिकीट

**पुणे, दि. ३१ प्रतिनिधी**

पुणे शहराला गुन्हेगारीमुक्त करण्याचे आश्वासन देणारे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार सध्या आपल्या एका निर्णयामुळे वादाच्या भोऱ्यात सापडले आहेत. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने चक्क कुख्यात गुंडांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मैदानात उतरवले आहे. अजित पवारांनी पुण्यात मात्र गुन्हेगारांना सढळ हाताने 'एबी फॉर्म' दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पुण्यातील कुख्यात गुंड बापू उर्फ कुमार प्रभाकर नायर याला प्रभाग क्रमांक 39 मधून राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी जाहीर केली आहे. बापू नायरवर हत्या, हत्येचा प्रयत्न, खंडणी आणि मोक्का यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. तो काही काळापूर्वीच जामिनावर बाहेर आला असून, शिवसेनेचे माजी पदाधिकारी दीपक मारटकर यांच्या खून प्रकरणातही त्याचे नाव आहे. अशा व्यक्तीला उमेदवारी दिल्याने पोलीस आणि प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.




## नवे वर्ष शुभ फलदायी ठरो!




गतवर्षी १२ वाजून एक मिनिटांनी २०२५ची सुरुवात झाली. डिसेंबरचा शेवटचा क्षण आणि जानेवारी एकचा पहिला क्षण या दोघांच्या मिलनाला आपण नवीन वर्षाची सुरुवात म्हणतो. पाश्चात्य लोक नव्या दिवसाची सुरुवात रात्री बारा वाजता करतात, म्हणजे ते अंधाराकडून उजेडाकडे जातात आपण उजेडाकडून व्हाया अंधार ते पुन्हा उजेडाकडे येतो. अंधार म्हणजे काटेकुटे, खाचखळगे आणि ओबड धोबडपणाचा रस्ता अशी संकल्पना आहे. पण नव्या प्रभातीच्या आशेने आपण नवीन वर्षाचे स्वागत करतो. आपले नवीन वर्ष खरे म्हटलं तर गुढीपाडव्याला सुरू होते. गुढीपाडवा ते गुढीपाडवा संवत्सर म्हणजे आपले वर्ष आहे. बरं आपल्या वर्षात कधीकधी १३ महिनेही असतात ते जाऊ द्या. सध्या आपण तसेही ५०% इंग्रजाळलेलोच आहोत. मराठीच्या शाळा ओस पडत आहेत. आज-काल बहुतेक मुलांच्या आया आपल्या बाळाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करत आहेत. या भव्य भव्य इमारतींच्या शाळा पाहिल्यावर डोळे दिपून जातात. त्यांचा शिक्षणासाठीचा खर्च ज्याला आपण फी म्हणतो तो वर्षाला सहा आकड्यांमध्ये असतो. कोणे एकेकाळी या देशांमध्ये सामान्यांसाठी शिक्षण मोफत होते, आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. पूर्वीच्या काळी गरीब आणि श्रीमंत एकाच वर्गात आणि एकाच शाळेत शिकत असत. तेव्हा महिन्याला चार ते आठ आणे देणारा श्रीमंत समजला जाई. त्यावेळी शिक्षणात तरी कुठलाही भेदभाव नव्हता कारण त्याकाळी शिक्षक तळमळीने शिकवित असत. संपूर्ण अभ्यासक्रम ज्याला हल्ली आपण सिलॅबस म्हणतो तो अपूर्ण राहिला असेल. तर तेव्हाचे शिक्षक शाळा सुटल्यावरही आपला ज्यादा वेळ देऊन विद्यार्थ्यांना शिकवणे, हे आपले कर्तव्य आहे या भावनेतून शिकवीत असत. तेव्हाचे शिक्षक हे गुरुजी होते ते सरस्वतीचे उपासक होते, काही तसेच चांगले अपवाद सोडून आत्ताचे शिक्षक लक्ष्मी देवीची आराधना करतात. शाळेत भरमसाठ पगार मिळत असला तरी काही अपवाद सोडता सरकारी शाळा आता शिक्षणाचे केंद्र आहे असे वाटत नाही. हल्ली शिक्षकांनाही विविध कामे दिली जातात त्यामध्ये आपल्या गावात किती कुत्रे आहेत यांची गणती करण्याचे कामही दिल्याचे आम्ही ऐकलेले आहे. मतदानासाठी नाव नोंदणी करणे, गणना करणे वगैरे सारखी कितीतरी कामे सरकारी शाळांच्या शिक्षकांना करावी लागतात. खाजगी शाळांची परिस्थिती वेगळी आहे, शिक्षणाच्या नियमित राशी शिवाय इमारतीच्या बांधकामा पासून स्वच्छतागृहापर्यंत आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या नावाने वर्षभर वसुली चालूच असते. खरे पाहिले तर प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे पण आपली सर्व सरकारे याबाबतीत डोळे उघडे ठेवून झोपलेली दिसतात. त्यांचे कानही त्यांना जे ऐकायचे असते तेवढेच ऐकतात. आपले हे वर्ष तर संपले, संपणारे वर्ष आणि नवीन वर्ष यांच्या संधी काळात मोठ्या प्रमाणावर मानसिक सौख्यासाठी रात्रभर भिन्नभिन्न प्रकारचा उत्सव सुरू असतो. या उत्सवाच्या सुवासाने अनेक घटना आणि दुर्घटनाही घडतात पण आजच्या शुभ संधी काळात त्याची चर्चा न करता चांगल्याची चर्चा करूया. 'जुने जाउद्या मरणा लागूनि' असे न म्हणता 'जुने ठेवूया स्मरणासाठी, नववर्षात शुभ वर्तमानाच्या बांधू गाठी' इतकेच आपण म्हणूया. पुढील वर्षी नवनवीन शोधांद्वारे नव्यानव्या संधी प्रकाशात भाग्योदयाची नवी संधी शोधूया आणि इंग्रजाळलेल्या नववर्षाचे स्वागत करूया!

nagpurpost@gmail.com
mahasagarngp@gmail.com
Mob.No.9922970023




वर्ष २०२५ मधील अखेरचा दिवस, सरत्या वर्षाच्या मावळत्या सूर्याला नमस्कार करून निरोप देऊया.

**नववर्ष २०२६ तमाम देशवासियांना सुख-समृद्धी, भरभराट आणि आरोग्यपूर्ण जावो या शुभेच्छा!**

- संपादक दै. महासागर

# मुंबई भाजप ॲक्शन मोडवर

### बंडोबांना थंड करण्यासाठी दिल्लीतून थेट सूत्रे हलली

**मुंबई, ३१ विशेष प्रतिनिधी**

उमेदवारी अर्जांची अंतिम मुदत संपताच मुंबई भाजप पूर्णपणे ॲक्शन मोडवर गेल्याचं चित्र आहे. अनेक प्रभागांमध्ये तिकीट न मिळाल्याने उफाळून आलेली बंडखोरी ही निवडणुकीपूर्वीच थंड करण्यासाठी पक्षाने वेगळी, बहुपातळी रणनीती आखली आहे. येत्या काही दिवसांत मुंबई भाजपच्या प्रत्येक हालचालीकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागणार आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबईतील सर्व जिल्हाध्यक्षांकडून बंडोबांची तपशीलवार यादी मागवली जाणार आहे. कोण कुठल्या वॉर्डातून नाराज आहे, कुणी अपक्ष अर्ज भरलाय, कुणाला कोणत्या कारणामुळे नाराजी आहे याचा प्रभागनिहाय, नेत्यांनिहाय आढावा घेतला जाईल. अर्जांची मुदत संपल्यानंतर हा आढावा अधिक तीव्रतेने सुरू झाला आहे.

या प्रक्रियेत दिल्लीतून थेट हस्तक्षेप झाल्याचंही स्पष्ट होतं. केंद्रीय सहसंघटनमंत्री यांनी नुकतीच मुंबईच्या नेत्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत मुंबई भाजप अध्यक्ष यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. संदेश स्पष्ट होता बंडखोरी वाढू देऊ नका; प्रत्येक नाराजाशी थेट संवाद साधा.

बैठकीनंतर स्थानिक नेतृत्वांना ठोस सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. बंडखोरांशी संपर्क साधणे, त्यांची कारणे ऐकून घेणे आणि समेटाचा पहिला प्रयत्न स्थानिक पातळीवरच पूर्ण करणे ही जबाबदारी देण्यात आली आहे.

जर परिस्थिती आवाक्याबाहेर गेली, तर वरिष्ठ नेत्यांपर्यंत नेण्याची आणि त्यातून मार्ग काढण्याची जबाबदारीही स्थानिक नेत्यांवरच सोपवण्यात आली आहे.

उमेदवारी अर्ज २ जानेवारीपर्यंत मागे घेता येणार असल्याने पुढचे काही दिवस भाजपसाठी निर्णायक ठरणार आहेत. कोणते बंडोबा माघार घेतात, कोणांना पक्षातच सामावून घेतले जाते, आणि कुणाकडे कठोर भूमिका घेतली जाते यावर मुंबईतला अंतिम राजकीय ताळेबंद अवलंबून असेल. पक्षातील काही गटांना थोपवण्यासाठी समन्वय, समजूत आणि कडक संदेश या तिन्हीचा वापर होणार असल्याची चर्चा आहे. मुंबईतील बंडोबांचा संपूर्ण आढावा घेतल्यानंतरच पुढचा निर्णय घेतला जाणार आहे,

# भाजपचे सहा उमेदवार बिनविरोध

**मुंबई, दि. ३१ विशेष प्रतिनिधी**


**राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी अजून पंधरा दिवस बाकी असतानाच राजकीय वातावरण तापलेले असताना, अचानक समोर आलेल्या एका घडामोडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार असली, तरी त्याआधीच भाजपने विजयाचा नारळ फोडल्याची चर्चा सुरू झाली आहे. उमेदवारी अर्जांची लगबग, एबी फॉर्मसाठीची झुंबड, नाराजीनाट्य आणि पक्षांतरांच्या रणधुमाळीतच ही बातमी राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी ठरते आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज्यात भाजपाचे सहा नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत रेखा चौधरी आणि आसावरी नवरे या दोन नगरसेविकांना बिनविरोध विजय मिळाला आहे. प्रभाग १८ अ' मधून रेखा राजन चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अखेरच्या क्षणी कोणताही विरोधक अर्ज दाखल न केल्यामुळे ते बिनविरोध नगरसेविका ठरल्या. पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरणाऱ्या आसावरी केदार नवरे यांनी प्रभाग २६ (क) मधून खुल्या प्रवर्गातून अर्ज दाखल केला होता. त्यांच्या विरोधात एकही अर्ज न आल्यामुळे त्यांचा विजय निश्चित झाला. त्यानंतर रंजना पेणकर डोंबिवली 'प्रभाग २६ (ब)' मधून यांचा देखील बिनविरोध विजय झाला आहे. याशिवाय, पनवेल महानगरपालिकेत नितीन पाटील यांची प्रभाग क्रमांक १८ (ब) मधून बिनविरोध निवड झाली आहे. तसेच धुळे महानगरपालिकेत भाजपच्या उज्ज्वला भोसले या प्रभाग क्रमांक १ मधून नगरसेवक पदावर बिनविरोध निवडून आल्या आहेत. निवडणुकीला अजून वेळ असतानाच मिळालेला हा दुहेरी फायदा भाजपसाठी मानसिक आघाडी ठरतोय का? की हा केवळ सुरुवातीचा योगायोग आहे? आजच्या कागदपत्र पडताळणीनंतर संपूर्ण चित्र स्पष्ट होईल. मात्र, निवडणुकीपूर्वीच कल्याण-डोंबिवलीत उधळलेला हा विजयाचा गुलाल पुढील राजकीय समीकरणांवर काय परिणाम करणार याकडेच आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संजय राऊत यांना बॉम्बने उडवण्याची धमकी

**मुंबई, दि. ३१ विशेष प्रतिनिधी**

मुंबईच्या राजकीय वर्तुळात आज अचानक अस्वस्थता पसरली. ठाकरे गटाचे खासदार आणि नेहमीच आक्रमक भूमिकेमुळे चर्चेत असलेले संजय राऊत यांना थेट बॉम्बनं उडवण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा धमकीचा संदेश त्यांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या गाडीवर लिहिलेला आढळून आला आणि क्षणातच संपूर्ण राजकीय वातावरण तापलं.



सत्ताधाऱ्यांवर सातत्यानं घणाघाती हल्ले करणाऱ्या राऊतांवर अशी थेट धमकी येणं, हे केवळ वैयक्तिक प्रकरण नसून, राजकीय दहशतीचा इशारा मानला जात आहे. संदेश नेमका कोणी, केव्हा आणि कशा हेतूने लिहिला याबाबत अद्याप गूढ कायम आहे. मात्र, हा प्रकार उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच मुंबई पोलीस तत्काळ संजय राऊत यांच्या निवासस्थानी दाखल झाले. परिसराची नाकाबंदी, गाडीची तपासणी आणि प्राथमिक चौकशी सुरू करण्यात आली. राऊत कुटुंबीयांचीही सविस्तर विचारपूस करण्यात आली असून, सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## नाशिक-सोलापूर 'सहा पदरी' महामार्गाला केंद्राची मंजुरी

**नवी दिल्ली, दि. ३१ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिक ते सोलापूर या ३७४ किलोमीटर लांबीच्या भव्य सहा पदरी महामार्गाला केंद्र सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्र एकमेकांना अधिक वेगाने जोडले जाणार आहेत.

या महामार्गाच्या बांधकामासाठी सुमारे १९ हजार १४२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सध्या नाशिक ते सोलापूर प्रवासासाठी लागणारा ३१ तासांचा वेळ (जड वाहतुकीसह) आता थेट १७ तासांवर येणार आहे. तसेच सध्याचे ४३२ किलोमीटरचे अंतर कमी होऊन ते ३७४ किलोमीटरवर येईल. हा महामार्ग केवळ शहरांनाच नाही, तर ८ रेल्वे स्थानके आणि ६ विमानतळांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

हा महामार्ग महाराष्ट्रातील महत्त्वाच्या चार जिल्ह्यांमधून जाणार आहे. यामध्ये नाशिक, अहिल्यानगर (अहमदनगर), धाराशिव आणि सोलापूरचा समावेश आहे. या महामार्गामुळे राज्याच्या दळणवळणाला नवी गती मिळेल. विशेषतः शेतमाल आणि औद्योगिक उत्पादनांच्या वाहतुकीसाठी हा मार्ग 'गेम चेंजर' ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नाशिक ते अक्कलकोट दरम्यानचा हा ग्रीनफिल्ड मार्ग वाढवण बंदर इंटरचेंजजवळ दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेला, नाशिकमध्ये राष्ट्रीय महामार्ग -६० (आडेगाव) च्या जंक्शनवर आग्रा-मुंबई कॉरिडॉरला आणि पांगरी (नाशिक जवळ) येथे समृद्धी महामार्गाला जोडण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रस्तावित मार्ग पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत थेट दळण वळण उपलब्ध करेल. चेन्नई बंदराच्या बाजूने, तिरुवल्लूर, रेणिगुंटा, कडप्पा आणि कुर्नूलमार्गे चेन्नई ते हसापूर (महाराष्ट्र सीमा) पर्यंत (७०० कि.मी. लांब) चार पदरी मार्गिकेचे काम प्रगतीपथावर आहे.

## पोलीस महासंचालकपदी सदानंद दाते ३ जानेवारीला पदभार स्वीकारणार

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

राज्याचे नवे पोलीस महासंचालक म्हणून सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचा पदावधी संपत आल्याने त्यांच्या जागी दाते यांची नेमणूक करण्यात आली आहे. गृह विभागाने बुधवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. सध्या राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) प्रमुख असलेल्या दाते यांची केंद्रातील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून त्यांना महाराष्ट्र केडरमध्ये पाठवण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी झाला होता. त्याचवेळी सदानंद दाते हे राज्याचे नवे पोलीस महासंचालक असतील हे स्पष्ट झाले होते. त्यानुसार येत्या ३ जानेवारीला दाते हे रश्मी शुक्ला यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारतील. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पोलीस महासंचालक पदावरील नियुक्तीचा पदावधी हा दोन वर्षांचा असणार आहे.

## ११ जानेवारीला पंतप्रधान मुंबईत

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकाची निवडणूक सर्वच पक्षांसाठी महत्वाची आहे. ठाकरे बंधुंसाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई आहे तर देश, राज्य जिंकणाऱ्या भाजपसाठी मुंबई महापालिका एक अपूर्ण स्वप्न आहे. त्यामुळे भाजप ही निवडणूक जिंकण्यासाठी आपली सर्व ताकद पणाला लावणार हे निश्चित होते. आता घडतही तसचं आहे. मुंबई आणि आसपासच्या महानगरातील महापालिका जिंकण्यासाठी महायुतीने प्रचाराचा मास्टरप्लान बनवला आहे. ११, १२ आणि १३ जानेवारीला मुंबई, नवी मुंबई, बोरीवली, ठाणे आणि मिरा-भाईंदर या ठिकाणी महायुतीच्या मोठ्या सभा होणार आहेत. या सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अमित शाह आणि भाजपच्या इतर राज्यातील मुख्यमंत्र्यांचीही उपस्थिती असणार आहे अशी सूत्रांची माहिती आहे. विकासाच्या नावावर मुंबईत महायुतीच्या सभांचे आयोजन करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: मुंबईत येत आहेत. त्यांची सभा होणार आहे. यावर उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी टीका केली आहे. "महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रपतीला आणलं तरी आश्चर्य वाटणार नाही. परदेशात मोदींना मिठ्या मारणारे लोक आले तरी आश्चर्य वाटणार नाही. भाजपची ती परंपरा झाली आहे. ११ तारखेला मोदी मुंबईत येत आहेत. १३ तारखेला प्रचार संपतोय. एका खास धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले आहे" असे संजय राऊत म्हणाले.

## मिरा भाईंदरचा महापौर उत्तर भारतीय होणार

### कृपाशंकर यांच्या विधानाने वाद पेटण्याची चिन्हे

**भाईंदर, दि. ३१ प्रतिनिधी**

भाजपाने मुंबईसह सगळ्या महापालिका निवडणुकांसाठी कंबर कसली आहे. महायुतीनेही जोरदार तयारी केली आहे. तसंच महाविकास आघाडीही लढते आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनीही युती केली आहे. अशातच मीरा भाईंदरमध्ये कृपाशंकर सिंह यांनी एक वक्तव्य केले आहे. उत्तर भारतीय महापौर बसेल इतके नगरसेवक निवडून आणू असे वक्तव्य कृपाशंकर सिंह यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात भुवया उंचावल्या आहेत.



"बिहारच्या निवडणुकीनंतर ही नववी सार्वजनिक निवडणूक आहे. लवकर महापालिका निवडणुका व्हाव्यात अशी जनतेची इच्छा होती. मीरा भाईंदरसह २९ महापालिकांमध्ये भाजपा महायुतीची सत्ता येईल. शिवाय इतके नगरसेवक निवडून आणू की उत्तर भारतीय महापौर बसेल." असा दावा कृपाशंकर सिंह यांनी केला आहे. कृपाशंकर सिंह यांचं हे वक्तव्य चर्चेत आले आहे.

कृपाशंकर सिंह पुढे म्हणाले, नकली शिवसेना गेली, आता खरी शिवसेना आमच्याबरोबर आहे. हिंदुत्व आणि विकास हा आमचा मुद्दा आहे. देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मजबूत आहे. उत्तर प्रदेशात बाबा का बुलडोझर चालतो तसा देवेंद्र फडणवीस यांनी विकासाचा बुलडोझर महाराष्ट्रात सुरु आहे. जो कुणी विकासाच्या आड येईल त्यांना उद्ध्वस्त करुन भाजपाच्या नेतृत्वात २९ महापालिकांमध्ये भाजपा-महायुतीची सत्ता येईल असे कृपाशंकर सिंह यांनी म्हटले आहे.

मीरा भाईंदरचा विकास भाजपाने कसा केलाय? हे उत्तर भारतीयांना सांगण्याची गरज होती म्हणूनच हा आजचा मेळावा होता. आम्ही प्रत्येक समाजाच्या बैठकीचं आयोजन केलं. मीरा भाईंदरमध्ये वेगवेगळ्या समाजाचे मेळावे आम्ही घेत आहोत. आमची भूमिका त्यांच्यासमोर ठेवत आहोत. मीरा भाईंदरमध्ये बहुतांश महापौर उत्तर भारतीय होते, आताही उत्तर भारतीय महापौर असेल असं नरेंद्र मेहतांनी म्हटलं आहे. महापालिका निवडणुकांचा प्रचार आता लवकरच सुरु होईल. दरम्यान मीरा भाईंदरमध्ये कृपाशंकर सिंह यांनी जे वक्तव्य केलं त्याची चर्चा रंगली आहे.




## संभाजीनगरमध्ये नाराज इच्छुकांचा आक्रोश, कराड यांच्या कारला घेराव

**छ.संभाजीनगर, दि. ३१ प्रतिनिधी**

महायुती तुटल्यानंतर छत्रपती संभाजीनगर भाजपमध्ये उमेदवारी वाटपावरून सुरू असलेला वाद आता नियंत्रणाबाहेर गेल्याचं चित्र दिसून येत आहे. भाजपच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयासमोर संतप्त कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. यावेळी कार्यकर्त्यांनी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांची गाडी रोखून धरली, तर कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला काळे फासून आपला तीव्र निषेध नोंदवला. एका कार्यकर्त्याने अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. यावेळी पोलिस संरक्षणात सावे आणि कराड यांनी काढता पाय घेतला.



छत्रपती संभाजीनगरमध्ये उमेदवारीवरून भाजपमध्ये सलग दुसऱ्या दिवशीही मोठ्या प्रमाणावर गोंधळ निर्माण झाल्याचं चित्र दिसून येत आहे. संतापलेल्या इच्छुक उमेदवारांनी आणि संतप्त कार्यकर्त्यांनी भाजप नेते भागवत कराड आणि अतुल सावे यांच्या गाडीला घेराव घातला, यावेळी त्यांनी मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त करत गंभीर स्वरूपाचे आरोप देखील केले. यावेळी संतापलेल्या भाजप कार्यकर्त्यांनी सावे आणि कराड यांचे फोटो फाडले. इच्छुक उमेदवारांनी घटनास्थळी गोंधळ घातल अंगावरती पेट्रोल ओतून घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्याचबरोबर सावेंच्या पीएला आणि नातेवाईकांना तिकीट दिल्याचा आरोप केला आहे.

संतापलेल्या भाजप कार्यकर्त्यांनी सर्वे दाखवत आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. अतुल सावेंना नेमकं काय भेटलं, त्यांनी त्यांच्या पीएला उमेदवारी दिली, त्यांनी फक्त वंजारी लोकांना पुढे केलं, त्यांनी आत्ताच्या आत्ता सर्वे आणावा, जर त्यात माझं नाव नाही आलं तर मी आयुष्यभर त्यांची गुलामी करेन, भागवत कराडांनी फक्त वंजाऱ्यांना तिकीट दिलं, असं म्हणत कार्यकर्त्यांनी अतुल सावे आणि भागवत कराड यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. एकेरी शब्दात उल्लेख करत कार्यकर्त्यांनी शिवीगाळ केल्याचंही यावेळी दिसून आलं.

# रायगडमध्ये आंदोलनांचा धडाका! वर्षभरात 433 मोर्चे अन् उपोषणे; अनेक प्रश्न अजूनही 'लाल फितीत'

**अलिबाग प्रतिनिधी ।**
२०२५ हे वर्ष रायगड जिल्ह्यासाठी आंदोलनांचे वर्ष ठरले आहे. आपल्या न्याय्य हक्कांसाठी आणि प्रलंबित मागण्यांसाठी जिल्ह्यातील विविध संघटना, राजकीय पक्ष आणि नागरिकांनी वर्षभरात तब्बल ४३३ आंदोलने केली. यामध्ये १६ मोर्चे, १५४ आंदोलने आणि २६३ उपोषणांचा समावेश आहे. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणावर आवाज उठवूनही अनेक प्रश्न अद्याप शासनाच्या 'लाल फितीत' अडकलेले आहेत.



आंदोलनांचे प्रमुख मुद्दे:
* प्रकल्प व रोजगार: जिल्ह्यातील २ हजार प्रकल्पांमध्ये स्थानिकांना प्राधान्य, नोकरीत कायम करणे आणि उसर येथील मेडिकल कॉलेजमधील रोजगारासाठी आंदोलने झाली.
* रस्ते आणि पायाभूत सुविधा: मुंबई-गोवा महामार्ग, अलिबाग-पेण आणि अलिबाग-रोहा रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात पत्रकारांपासून राजकीय पक्षांपर्यंत सर्वांनीच लढा दिला. काही ठिकाणी खड्ड्यांत पोहण्याचे व झाडे लावण्याचे अभिनव आंदोलनही करण्यात आले.
* आरक्षण व समाजहित: मराठा, कुणबी, धनगर आणि ओबीसी आरक्षणावरून जिल्ह्यात अनेक मोर्चे निघाले. तसेच 'स्मार्ट मीटर' विरोधात शेकापने आक्रमक पवित्रा घेतला.
* पाणी व कर्मचारी प्रश्न: जलजीवन मिशनमधील त्रुटी, अंगणवाडी सेविका, जुनी पेन्शन योजना आणि कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे धरण्यात आली.

आश्वासनांचा पाऊस, कार्यवाहीचा दुष्काळ?
प्रशासनाने अनेक आंदोलकांशी चर्चा करून प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले, मात्र प्रत्यक्षात २५ टक्के आंदोलकांना पोलीस कारवाईला सामोरे जावे लागले. मिनीडोअर वयोमर्यादा, पाणी प्रश्न आणि कामगार कायद्यातील बदल यांसारखे महत्त्वाचे प्रश्न अजूनही कागदावरच आहेत.
आता सरत्या वर्षातील ही आंदोलने पाहता, २०२६ या नवीन वर्षात शासन या प्रलंबित मागण्यांची दखल घेऊन नागरिकांना दिलासा देणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पेण शहरात थर्टी फर्स्ट निमित्त पोलिसांकडून नाकाबंदी



**पेण प्रतिनिधी ।**
पेण शहरात थर्टी फर्स्ट सह नवीन वर्षाकरिता पोलिसांकडून संपूर्ण शहरभर नाकाबंदी करण्यात आली असल्याने मद्यप्राशन तसेच हुल्लडबाजी करणाऱ्यांवर यामुळे चाप बसणार आहे. शहराच्या खोपोली बायपास, जुना पेट्रोलपंप, नगरपालिका नाका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाम रोड यासह बोरगाव या ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे.तसेच पेण शहर, पेण ग्रामीण, वरसई भाग, खरोशी भाग या गावांच्या हद्दीतील वाहने सुद्धा तपासणी करण्यात येत आहे. पोलिस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली ८ अधिकारी, ५४ पोलीस अंमलदार, ८ होमगार्ड, ३ वाहतुक पोलीस अंमलदार यांचा मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून जाणा-या येणाऱ्या प्रत्येक वाहनांवर पोलिसांची करडी नजर आहे. त्यामुळे या कारवाईत ड्रिंक अँड ड्राईव्हच्या अनेक केसेस होत आहेत. थर्टी फर्स्ट निमित्त मद्यप्राशन तसेच हुल्लडबाजी करणाऱ्यांवर यामुळे चाप बसणार आहे.नागरिकांनी २०२६ चे सरते वर्ष आणि येणारे नवीन वर्ष याचे स्वागत करताना आनंदाने आणि उत्साहाने साजरा करावा मात्र कोणीही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी केले

# पनवेल बांधकाम व्यवसायिकांनी मनपाच्या सुचनांचे पुर्णत: पालन करावे

## अन्यथा कठोर कारवाई करणार : आयुक्त मंगेश चितळे

**पनवेल प्रतिनिधी ।**
पनवेल मनपा हद्दीतील बांधकाम व्यावसायिकांसाठी महानगरपालिकेने दिलेल्या सुचनांचे पुर्णत: पालन करावे अन्यथा महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी केले.



पनवेल मनपा कार्यक्षेत्रात बांधकामांच्या ठिकाणी धूळ प्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी मनपा क्षेत्रातील बांधकाम व्यवसायिकांची आज महापालिका मुख्यालयात बैठक घेण्यात आली यावेळी आयुक्त बोलत होते. याबैठकिस अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, उपायुक्त स्वरूप खारगे,रचना सहाय्यक अनिकेत दुर्गावळे, मुख्य आरेखक नितीन हुद्दार उपस्थित होते.
वायु प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक काटेकोरपणे राबविण्यावर महापालिका भर देत आहे. हवा प्रदूषण , स्वच्छता ,सुरक्षा व्यवस्था या संदर्भात महापालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम विकासकांनी योग्य ती काळजी घ्यावी, यासाठीच्या उपाय योजना विहीत काळात केले नाही तर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट सूचना या बैठकित आयुक्तांनी दिल्या.
या मार्गदर्शक तत्वांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करावे असे यावेळी अतिरीक्त आयुक्त शेटे यांनी सांगितले. याकाळात केलेल्या कार्यवाहीचे फोटो महापालिकेकडे अपलोड करण्याच्या सूचना अतिरीक्त आयुक्तांनी यावेळी उपस्थितांना दिल्या.
यावेळी बांधकाम क्षेत्राशी निगडीत क्रिडाई, एमसीएचआय, बीएनएएम संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ व एमआयडीसीचे अधिकारी अनुपस्थितीत होते. याबाबत आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली.

# पालिका निवडणुकीत बंडखोरांना कसे थोपविणार

**नवीन पनवेल प्रतिनिधी ।**
पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत रंगत निर्माण झाली आहे. भाजपा युतीविरोधात शेकाप महाविकास आघाडी लढताना दिसत आहे. मात्र अनेक ठिकाणी बंडखोरी झाल्याने या बंडखोरांना कसे थोपवणार असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे.
कळंबोलीतून भाजप पक्षातर्फे विजया कदम प्रभाग 8 मधून इच्छुक होत्या. मात्र त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी 30 डिसेंबर रोजी अपक्ष म्हणून अर्ज भरला तर देवीदास खेडकर यांनी देखील भाजपकडून उमेदवारी मागितली होती. मात्र त्यांना उमेदवारी न मिळाल्याने प्रभाग आठ मधून त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. वंचित बहुजन आघाडीकडून देखील काही ठिकाणी उमेदवार उभे करण्यात आले आहेत. भाजप, शेकाप, शिवसेना आणि इतर पक्षांमध्ये बंडखोरी करण्यात आल्याने आता त्यांचे पक्षश्रेष्ठी उमेदवारांची बंडखोरी कशाप्रकारे थोपवतात हे येत्या काही काळात दिसणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 2 जानेवारी आहे. या काळात अनेक अपक्ष आणि बंडखोरी केलेल्या उमेदवारांची मनधरणी पक्ष श्रेष्ठींना करावी लागणार आहे.
उमेदवारी अर्ज भरण्याचा 30 डिसेंबर हा शेवटचा दिवस होता. त्यामुळे अनेक उमेदवारांची धावपळ उडाली. उद्धव सेनेतील काही उमेदवारांनी मशालीवर निवडणूक न लढवता महाविकास आघाडीतील शिट्टीवर निवडणूक लढवत आहेत तर आरपीआयचे प्रभाकर कांबळे हे कमळ या निशाणीवर निवडणूक लढवत आहेत

# "भाजपचा विजय असो", "पुन्हा एकदा कमळ फुललं" अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी आनंद

**पनवेल प्रतिनिधी ।**
पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने विजयी सुरुवात करताच संपूर्ण परिसरात जल्लोषाचं वातावरण निर्माण झालं आहे. प्रभाग क्रमांक १८ मधून भाजपचे उमेदवार नितीन पाटील हे बिनविरोध निवडून आल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि जल्लोषात कार्यकर्त्यांनी हा ऐतिहासिक क्षण साजरा केला.
निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अधिकृत निकाल जाहीर करताच भाजप कार्यालयाबाहेर जल्लोषाला उधाण आलं. "भाजपचा विजय असो", "पुन्हा एकदा कमळ फुललं" अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. मिठाई



वाटप, फुलांची उधळण आणि एकमेकांचे अभिनंदन करत हा क्षण अविस्मरणीय बनवण्यात आला.
यावेळी आमदार प्रशांत ठाकूर जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी राज्य परिषद सदस्य अरुण शेठ भगत ज्येष्ठ नेते नंदू पटवर्धन पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी यांनी नितीन पाटील यांना बिनविरोध निवडून आल्याबद्दल शुभेच्छा दिल्या
या विजयामुळे आगामी महापालिका निवडणुकीसाठी भाजपचा आत्मविश्वास अधिकच बळावला असून, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारलं आहे. हा विजय म्हणजे विकासाच्या राजकारणावर जनतेने शिक्कामोर्तब केल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.
नितीन पाटील यांच्या विजयाने पनवेलमध्ये भाजपची घोडदौड सुरू झाल्याचे चित्र असून, पुढील लढतीसाठी कार्यकर्ते जोमाने तयारीला लागले आहेत

# मंगेश काळोखे हत्याकांड प्रकरण नाव साधर्म्याने खोपोलीत हळहळ

**खोपोली प्रतिनिधी ।**
खोपोलीतील घटनेने महाराष्ट्र ढवळून निघाला आहे राजकीय आरोप प्रत्यारोप व अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष व प्रवक्ते नांव हत्याकांडातील FR मध्ये आल्याने सत्ताधारी पक्षातील कलगीतुरा व राज्याच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिडीत कुटुंबाची सांत्वनासाठी घेतलेली भेट, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी आरोप असलेल्या जिल्हाध्यक्षासाठी कर्जतमधील पक्ष कार्यालयात आरोपीचे केलेले समर्थन तसेच चुकीने पोलीसांनी दबावाखाली केलेला एफ आर या बाबत थेट मुख्यमंत्री व गृहमंत्री यांची भेट घेऊन अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करणे, एस आय टी मार्फत चौकशी या घडामोडी राज्याच्या सत्ताधारी गटाची व राजकारणाची दिशा आणि दशा दर्शवणारी ठरत असताना खोपोलीतील एका बातमी खोपोलीकरांना हळहळ व



जोराचा झटका देणारी ठरली.
रायगड पोलीसांनी हत्याकांडातील संशयित ९ आरोपींना अटक केल्याची नाव जाहीर करण्यात आली. पैकी ९ नंबरचा आरोपी दिलीप हरीभाऊ पवार हे नाव येताच खोपोली खालापूरकरांच्या भुवया उंचावल्या तर काहींची झोप मोडली. दिलीप हरीभाऊ पवार रा.रहाटवडे येथील पत्रकार क्षेत्रातील अबोल व्यक्तीमत्व, कधीही वादग्रस्त नाही, कोणालाही साधी शिवीगाळ नाही, गरजवंताला मदतनीस ठरणारे खोपोलीकरांचे दिलीपभाऊ तसेच गेली 20 वर्षे पत्रकारितेत निष्कलंक कार्य, वृत्तपत्र विक्रेते दिलीप पवार हे हत्याकांडातील संशयित म्हणून अटक केली ही बातमी वाऱ्यासारखी खोपोलीत पसरली आणि भल्या पहाटे फोन खणखणू लागले तर खोपोली पोलीस ठाणे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक परीसरात विचारपूस करण्यासाठी हितचिंतक, पत्रकार, वृत्तपत्र वाचक व नातेवाईक यांची रिघ लागली. दिलीप पवार असं करुच शकत नाहीत असा सुर उमटू लागला. काही झालं तरी दिलीप पवार यांच्या मागे उभे राहण्याचा निर्धार केला गेला. दिलीप पवार भारतीय जनता पार्टीचे खोपोली शहर उपाध्यक्ष असल्याने पवारांना भाजप कार्यकर्ते मनोधैर्य वाढविण्यासाठी मेसेज येऊ लागले काही प्रत्यक्ष जातीने हजर राहीले.
मात्र हत्याकांडातील संशयित आरोपी दिलीप पवार या नावात साधर्म्य असुन दिलीप हरीभाऊ पवार हा आरोपी वाशी नवी मुंबई येथील मुख्य आरोपींचा जवळचा स्नेही असल्याचे समोर आल्याने पत्रकार दिलीप पवार यांच्या हितचिंतकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

# कोंडगाव धरण परिसरात आत्मोन्नती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी निसर्ग शिबिराचे आयोजन

**सुधागड–पाली प्रतिनिधी ।**
सुधागड अभयारण्यातील कोंडगाव धरण परिसरात महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, रायगड यांच्या वतीने पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत आत्मोन्नती विद्यालय, जांभूळपाडा येथील विद्यार्थ्यांसाठी निसर्ग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातून विद्यार्थ्यांना निसर्ग, वन्यजीव आणि जैवविविधतेचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले.
या उपक्रमासाठी सामाजिक वनीकरण सुधागडचे वनक्षेत्रपाल प्रशांत निकाळजे, वनपाल सुहास रणवरे, वनरक्षक राजेंद्र बेवनाळे,



भास्कर पवार, अतुल अहिरे, पर्यवेक्षक विश्वास ढोपे तसेच वरिष्ठ शिक्षक वेत्रवान गुरव, सहायक शिक्षिका अंजना पिसे, मिलिंद शिंदे आणि शेखर राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.
शिबिरात सहभागी ५० विद्यार्थ्यांसाठी कॅप, जेवण आणि ये-जा करण्याची व्यवस्था सामाजिक वनीकरण विभागाकडून करण्यात आली होती. विद्यालयाचे प्राचार्य आणि पालकवर्गाने या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.
शिबिरात भारतातील अग्रगण्य पर्यावरण व जैवविविधता संवर्धन संस्थेचे वन्यजीव अभ्यासक प्रशांत गोकर्णकर यांनी विद्यार्थ्यांना जंगलातील पक्ष्यांचे आवाज ओळखण्याचे प्रशिक्षण दिले. तसेच हिंस्त्र प्राण्यांचे जीवनचक्र, अधिवास, अन्नसाखळी आणि पर्यावरणातील त्यांचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. जंगलात आढळणाऱ्या औषधी वनस्पतींचे प्रत्यक्ष दर्शन घडवून त्यांचे औषधी उपयोगही समजावून सांगण्यात आले.
वर्गशिक्षक शेखर राऊत यांनी सांगितले की, "मुलांच्या डोळ्यांत प्रश्न होते आणि त्या प्रश्नांतून निसर्ग समजून घेण्याची जिज्ञासा दिसत होती. हेच या शिबिराचे खरे यश आहे."
या निसर्ग शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव, निसर्गाविषयी आदर आणि जैवविविधतेच्या जतनाची भावना निर्माण झाली. निसर्गाशी सुसंवाद राखणे ही काळाची गरज असून, अशा उपक्रमांमुळे भावी पिढी पर्यावरणाबाबत अधिक सजग होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# कुडे लेणी येथे ऑडिओ गाईड क्यू आर कोडचे उद्घाटन.

**तळा प्रतिनिधी ।**
रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील ऐतिहासिक प्राचीन कुडा लेण्यांविषयी माहिती देणाऱ्या ऑडिओ गाईड क्यूआर कोडचे उद्घाटन भारतीय पुरातत्व विभाग नवी दिल्ली डायरेक्टर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी भारतीय पुरातत्त्व विभाग नवी दिल्लीचे डायरेक्टर, मुंबई सर्कलचे अधीक्षक अभिजीत आंबेकर, मुरुड जंजिरा उप मंडळचे अधिकारी बजरंग येलीकर, येलीकर मॅडम तसेच कर्मचारी, पर्यटक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुरुड जंजिरा उपमंडळ चे अधिकारी बजरंग येलीकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मुंबई सर्कलचे अधीक्षक अभिजीत आंबेकर, यांनी भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण नवी दिल्ली डायरेक्टर यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.



महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यामध्ये कुडे येथील लेण्यांचा समूह एक प्रसिद्ध लेणी समूह आहे. कुडे लेणी तीन स्तरात कोरलेल्या आहेत. या लेणी समूहामध्ये अकरा पाण्याची टाकी, पाच चैत्यगृह आणि अन्यविहार आहेत. लेणी क्रमांक सहा सर्वात मोठे चैत्यगृह आहे. दुसऱ्या टप्प्यातील लेण्यांच्या समोरून पर्यटकांना राजपुरी खाडीचे विहंगमय दृश्य पहावयास मिळते. या लेण्यांची निर्मिती इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून ते चौथ्या शतकापर्यंत केली गेली. मुंबई पुणे पासून साधारणत: दिडशे किलोमीटर अंतरावर असलेल्या तसेच मुंबई - गोवा महामार्गावर असलेल्या इंदापूरपासून ३० किलोमीटर अंतरावर कुडे लेणी आहे. या लेणीला भेट देणाऱ्या पर्यटकांना लेण्यांविषयी माहिती मिळावी याकरिता भारतीय पुरातत्व विभागाने क्यूआर कोड स्कॅनर ऑडिओ गाईडची सुविधा हिंदी आणि इंग्रजी भाषेमध्ये पर्यटकांना उपलब्ध करून दिली आहे. पर्यटकांनी क्यूआर कोड स्कॅन करून मोबाईल फोन मध्ये येणाऱ्या डॅशबोर्ड वर मोबाईल नंबर समाविष्ट करून स्टार्ट ऑडिओ गाईड या बटनावर करावे. क्लिक केल्यावर लेण्यांविषयीची सविस्तर माहिती ऑडिओ स्वरूपात मोबाईल फोनमध्ये पर्यटकांना ऐकायला मिळणार आहे.

# स्नेह स्पंदन संस्थेकडून प्रेरणा विद्यालयात मुलांचा

## सामुदायिक वाढदिवस उत्साहात साजरा

**रोहा प्रतिनिधी ।**
स्नेह स्पंदन ही शैक्षणिक व सामाजिक संस्था गेली अकरा वर्षे सातत्याने रोहा येथील मतिमंद मुलांच्या प्रेरणा विद्यालयात विद्यार्थ्यांचा सामुदायिक वाढदिवस साजरा करत आहे. संस्थेच्या अध्यक्षा स्वाती शेळके यांच्या संकल्पनेतून यावर्षीही सोमवार, दिनांक २९ डिसेंबर रोजी हा उपक्रम उत्साहात पार पडला.
कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांना औक्षण करून करण्यात आली. दुपारी ३ वाजता केक कापून मुलांचा सामुदायिक वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.
या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रोहा नगरपरिषदेच्या नगरसेविका स्नेहा आंब्रे, केंद्र प्रमुख श्री. ईश्वर लाडे सर, त्वष्टा कासार समाज अष्टमीचे अध्यक्ष श्री. हेमंत साळवी व सभासद, त्वष्टा कासार महिला अध्यक्षा रूपाली सचिन



वडके, शिव आधार फाऊंडेशन चे अध्यक्ष नारायण खुळे, निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्था रायगड चे प्रथमेश कोळी,ब्रह्मकुमारी पूनम दीदी, जयश्री भांड आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा व आशीर्वाद दिले.
यावेळी मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या अध्यक्षा स्वाती शेळके म्हणाल्या, "ही परंपरा आम्ही गेल्या ११ वर्षांपासून जपत आहोत. वाढदिवस साजरा करताना मुलांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद अवर्णनीय आहे. हा कार्यक्रम माझे पती स्व. विठ्ठल रखमा शेळके यांच्या पुण्यतिथी दिनी आयोजित केला जातो.

# थेट नगराध्यक्ष पदाचे दावेदार चंद्रकांत चौधरी यांनी माथेरान नगर परिषदेचा पदभार स्वीकारला

**माथेरान प्रतिनिधी ।**
माथेरान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक 2 डिसेंबर रोजी पार पडली जवळपास नऊ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर प्रशासकीय राजवट संपुष्टात आली असून या निवडणुकी दरम्यान शिवसेनेचे कर्जत खालापूरचे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा जिल्हाप्रमुख प्रसाद थोरवे यांनी माथेरान नगर परिषदेच्या निवडणुकीची धुरा संभाळत जनतेतून थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांचा भरघोस मताधिक्याने विजयी झाला. यावेळी 21डिसें रोजी निकाला दरम्यान 21 सदस्यांपैकी शिवसेनेचे 12 आणि भाजपचे 3 असे महायुतीचे 15 सदस्य निवडून आलेत चंद्रकांत चौधरी यांनी मोठ्या मताधिक्याने विजय संपादन करून नगराध्यक्ष पदावर विराजमान होण्यासाठी प्रशासनाकडून दि. 30 रोजी पदभार सोहळा संपन्न करण्यात आला यावेळी माथेरानच्या स्वर्गीय हिंदुहृदय सम्राट



बाळासाहेब ठाकरे सभागृहात मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांचा यथोचित सन्मान करून नगराध्यक्ष पदाचा कार्यभार सुपूर्द करण्यात आला.
यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करत मोठ्या मताधिक्याने विजय संपादन करून दिल्याबद्दल माथेरानकरांसह कार्यकर्त्यांचे आभार मानले. उपस्थितांपैकी कोकणवासीय समाज तसेच श्रमिक हात रिक्षा संघटने तर्फे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत अभिनंदन केले. त्याचबरोबर माथेरान शहरातील कंत्राटी कामगारांची कोकण श्रमिक संघटना यांच्यावतीने देखील नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी त्याचबरोबर सर्व नगरसेवक नगरसेविका तसेच शिवसेनेचे पदाधिकारी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.
याप्रसंगी शिवसेनेचे शहर प्रमुख मनोज खेडकर, उपशहर प्रमुख प्रकाश सुतार, प्रमोद नायक,राजेश दळवी, प्रशांम दिवाडकर भाजप शहराध्यक्ष प्रवीण सपकाळ, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी,गटनेते शिवाजी शिंदे, रत्नदीप प्रधान, अश्व पाल संघटनेच्या अध्यक्षा आशा कदम तसेच माथेरान पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांच्यासह बहुसंख्य नागरिक तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगड जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे लेखाधिकारी म्हणून समीर अधिकारी यांची नियुक्ती.

**मुरुड जंजिरा प्रतिनिधी ।**
शिक्षण विभाग माध्यमिक लेखाधिकारी म्हणून समीर सुरेश अधिकारी हे रुजू झाले आहेत.मूळचे चोल आग्राव येथील रहिवाशी असणारे अधिकारी हे या पूर्वी रायगड जिल्हा परिषद कृषी विभागात सहाय्यक लेखाधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केले आहे.त्यांना पदोन्नती मिळून



ते आता माध्यमिक शिक्षण विभागाचे लेखाधिकारी म्हणून रुजू झाले आहेत.त्यांनी आपला पदभार नुकताच स्वीकारला आहे. अत्यंत शांत स्वभाव व सर्वांशी मिळून मिसळून व आपले पणाची वागणूक देणारे अधिकारी हे सर्वत्र सुपरिचित आहेत.त्यांनी आपला पदभार स्वीकारताच अनेक मान्यवर व मित्रमंडळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## भांडुप बेस्ट बस अपघाताची मानवाधिकार आयोगात तक्रार दाखल

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

भांडुप रेल्वे स्थानकाबाहेर सोमवारी रात्री घडलेल्या बेस्ट बसच्या अपघातात चौघांचा मृत्यू, तर अनेकजण जखमी झाले. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे वकील आशिष राय यांनी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. आयोगाने त्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वत:हून याप्रकरणी स्वत:हून याचिका दाखल करावी. तसेच, या घटनेची कसून चौकशी करून दोषी आढळणाऱ्या शासकीय, प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. पुराव्यासाठी सीसीटीव्ही चित्रफितीचा आधार घेण्याचे त्यांनी नमूद केले.



भांडुप बस अपघातातील बस चालकाला पोलिसांनी अटक केली असून त्याबाबत तपास सुरु आहे. ती घटना सोमवारी रात्री १०.५ च्या सुमारास भांडुप रेल्वे स्टेशनबाहेर घडली. दुर्घटनेत चौघांचा मृत्यू झाला असून ९ जण गंभीर जखमी झाले आहेत. याबाबत तक्रार करताना वकील आशिष राय यांनी कुर्ला बस अपघाताचाही तक्रारीत उल्लेख केला.

मुंबईत सातत्याने बेस्ट बसचे अपघात होत असून यापूर्वी अनेकजण जखमी झाले आहेत. यापूर्वी घडलेल्या घटनांमधून बेस्ट उपक्रमाच्या अधिकाऱ्यांनी काय धडा घेतला, काय उपाययोजना केल्या, याबाबत जनतेला माहिती मिळायला हवी, असे वकील आशिष राय म्हणाले.

# अखेर निष्ठावंतांच्या डोळ्यात अश्रू..! भाजपाला महागात पडणार का?
# महासागर डिजिटल चर्चासत्रात मान्यवरांची सडेतोड चर्चा







**रविकांत तुपकर, बिना गोगरी, महादेवी मठपतीसह संदीप काळे यांचा सहभाग**

**"महासागर न्यूज" चॅनलला सबस्क्राईब करा**

**मुंबई, दि. ३१**

काल उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता आणि या दिवशी अक्षरशः महाराष्ट्रात भाजपातील निष्ठावंतांचा आक्रोश पाहायला मिळाला. कुणी अंगावरती रॉकेल ओतून पेटून घेण्याचा प्रयत्न केला तर कोणी आक्रोश करत आपल्या अश्रूंना वाट दिली. यालाच अनुसरून 'महासागर' (युट्युब, टीव्ही) डिजिटल माध्यमातून आयोजित या विशेष चर्चा सत्रात शेतकरी नेते रविकांत तुपकर, दैनिक महासागर चे मुख्य समूह संपादक संदीप काळे, भाजपा महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सहसंयोजक बिना गोगरी, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव महिला मोर्चा महादेवी मठपती यांनी या चर्चासत्रात प्रामुख्याने सहभाग घेतला होता तर महासागर डिजिटल चे संपादक स्वप्निल दुधारे यांनी या चर्चासत्राचं निवेदन केलं.

महादेवी मठपती यांना अगदी शेवटच्या वेळी एबी फॉर्म देऊन देखील तिकीट नाकारल्यामुळे चर्चासत्र दरम्यानच हृदय भरून आल्याने त्यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. गेल्या अनेक वर्षापासून एकनिष्ठ भाजप पक्षात काम करीत असून आज जर मला तिकीट दिलं असतं तर मी नक्की निवडून आले असते असा विश्वास त्यांनी यावेळी दिला, भाजपा नेते अशोकराव चव्हाण यांनी तुम्हाला तिकीट देऊ असं आश्वासन दिल्यानंतरही मला तिकीट दिलं नाही असा थेट निशाणा चव्हाणांवर साधला तर रविकांत तुपकर यांनी या चर्चासत्रात भाजपाची पूर्वीची नीतिमूल्य आणि विचारधारा भाजपा आता विसरून गेला असून एकनिष्ठ कार्यकर्त्यांना भाजपाने डावलले आहे तर याच कार्यकर्त्यांनी आपली ताकद दाखवून भाजपाला धडा शिकवायला पाहिजे असा उपदेशही तूपकरांनी दिला. बीजेपीच्या बिना गोगरी यांनी या चर्चासत्रात आपलं मत मांडताना सांगितलं की मी 2017 पासून तिकीट मिळेल याकरिता प्रयत्नशील होते आणि मी फक्त भाजपाचं अगदी निष्ठेने काम करत आहे तरी देखील मला तिकीट दिलं नाही परंतु भाजपात अमाप इनकमिंग झाल्यामुळे पक्षाला ते बॅलन्स करता येणं शक्य झालं नसेल अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली तर या चर्चासत्रात संदीप काळे यांनी भाजपाची पूर्व पार्श्वभूमी काय होती आणि भाजप या काही निवडणुकीत किती बदलला याबद्दल सविस्तर चर्चा केली त्याचबरोबर भाजपा नव्या चेहऱ्यांना संधी देताना निष्ठावंत कार्यकर्त्यांना विचारात घेत नाही आणि त्यामुळे नक्कीच याचा फटका भाजपाला पडू शकतो असं मत देखील संदीप काळे यांनी यादरम्यान मांडलं.

## अंतिम दिनी २ हजार १२२ नामनिर्देशन अर्ज दाखल

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६ च्या अनुषंगाने नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच काल मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी २३ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांतून मिळून एकूण २ हजार १२२ नामनिर्देशन अर्ज दाखल दाखल झाले आहेत. तर, नामनिर्देशपपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत म्हणजे मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण मिळून २ हजार ५१६ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली आहेत. आज बुधवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून नामनिर्देशनपत्रांची छाननी केली जाणार आहे. छाननी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी लगेच प्रसिद्ध करण्यात येणार आहे. माननीय राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी जाहीर केलेल्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६ च्या कार्यक्रमानुसार, उमेदवारांना नामनिर्देशन पत्रे देण्यास मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २०२५ पासून सुरुवात झाली. त्यानुसार, मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते ४ यावेळेत नामनिर्देशनपत्रांचे वितरण तर, सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आली.

नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच काल मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी २३ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांतून मिळून एकूण २ हजार १२२ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत. तर, सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत ५९४ नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले आहे.

मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २०२५ ते मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण मिळून ११ हजार ३९१ नामनिर्देशन पत्रांचे वितरण झाले. तर, काल अखेर एकूण मिळून २ हजार ५१६ नामनिर्देशनपत्रे दाखल झाली आहेत.

## 'काँग्रेसमुक्त भारत'ची वल्गना करणारा भाजप झाला 'कार्यकर्तामुक्त'-हर्षवर्धन सपकाळांचा घणाघात

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनी भाजपाच्या अंतर्गत राजकारणावर प्रकाशझोत टाकला असून, मध्ये अभूतपूर्व अराजक निर्माण झाल्याचा आरोप चे अध्यक्ष यांनी केला आहे. "काँग्रेसमुक्त भारतची भाषा करणारा भाजप आज कार्यकर्तामुक्त भाजप बनला आहे," असा थेट हल्लाबोल त्यांनी बुलढाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

सपकाळ म्हणाले, महापालिका व नगरसेवक पदांसाठी उमेदवारी देताना पक्षासाठी झटलेल्या कार्यकर्त्यांना डावलून आयत्यावेळी आलेल्या उपऱ्यांना तिकीट देण्यात आले. त्यामुळे निष्ठावानांमध्ये प्रचंड असंतोष आहे. हा असंतोष केवळ एखाद्या शहरापुरता मर्यादित नसून राज्यभर सर्वदूर पसरलेला आहे. "आज जे चित्र महापालिकेत दिसतंय, तेच उद्या विधानसभा निवडणुकांत दिसेल," असा इशाराही त्यांनी दिला. भाजप आणि संघाच्या मूळ कार्यकर्त्यांना बाजूला सारून उपऱ्यांच्या हाती पक्ष गेल्याने पक्षाचं नियंत्रण नागपूरच्या 'रेशिमबागे'तून न राहता उद्योगपतींकडे जाईल, असा खोचक टोला सपकाळ यांनी लगावला. "लवकरच भाजप – चालवत आहेत, असे दिसेल," असा दावा करत त्यांनी भाजपच्या वैचारिक दिशेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीवर बोलताना सपकाळ यांनी आक्रमक सूर लावला. "तो गुंडांचाच पक्ष आहे. याआधी माफियांना प्रवेश देण्यात आला; मराठवाड्यात 'वरळी किंग'ला पक्षात घेतले गेले. कोयता गँगशी संबंधित लोक त्यांच्या पक्षात आहेत," असा आरोप त्यांनी केला. पुढे ते म्हणाले, "उपमुख्यमंत्री यांच्या सातारा जिल्ह्यातील भावाच्या शेतातील ड्रग्ज कंपनीचा वितरक हा अजित पवारांच्या पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे दिसून आले आहे," असा दावाही त्यांनी केला. या राजकीय धुरळ्यात काँग्रेसचा पुढचा डावही सपकाळ यांनी स्पष्ट केला. "२०२६ हे वर्ष काँग्रेससाठी संघटनात्मक वर्ष असेल. तयारी डिसेंबरपासूनच सुरू आहे. मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश होत आहेत; वैचारिक कटिबद्धता वाढते आहे. नवीन वर्षात वैचारिक मेळ आणि मूठ बांधणी—हेच आमचं ध्येय," असे सांगत त्यांनी काँग्रेसच्या मनोबलावर भर दिला.

भाजपमध्ये उमेदवारीवरून उसळलेली नाराजी, उपऱ्यांना मिळणारी मर्जी आणि कार्यकर्त्यांची कोंडी—या पार्श्वभूमीवर सपकाळांचे आरोप केवळ टीका म्हणून बाजूला काढता येणार नाहीत. 'कार्यकर्तामुक्त' हा शिक्का भाजप पुसू शकेल का, की ही आग निवडणुकांपर्यंत धगधगत राहील? उत्तर लवकरच मतपेटीतून मिळणार आहे.

## रामदास आठवले यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला हव्या असणा-या महत्वाच्या जागा भाजप आणि शिवसेना दोन्ही पक्षाच्या कोटयातील जागा रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात येणार आहेत. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपचे मुंबईचे अध्यक्ष अमीत साटम आणि प्रविण दरेकर यांना निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षातीलही काही जागा रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात येणार आहेत. रिपब्लिकन पक्षाने 17 जागांची अंतीम यादी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आज सोपवली. त्यातील किमान 12 जागा रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात येणार आहेत. अन्य जागांवर रिपब्लिकन पक्षांची मैत्रीपूर्ण लढत होणार आहे. तसेच मुंबई मनपा च्या उर्वरित 197 जागांवर रिपब्लिकन पक्ष महायुतीचा घटकपक्ष म्हणून महायुती उमेदवारांचा प्रचार करणार अशी माहिती आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी वर्षा बंगल्या बाहेर पत्रकारांना दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भेटलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळात रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, काकासाहेब खंबाळकर;राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, युवक आघाडी अध्यक्ष पप्पु कागदे, एम एस नंदा, हेमंत रणपिसे सचिनभाई मोहिते, आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीच्या जागा वाटवात रिपब्लिकन पक्षाला एकही जागा देण्यात आली नसल्यामुळे रिपब्लिकन पक्ष नाराज होता, या नाराजीतुन रिपब्लिकन पक्षाच्या 30 उमेदवारांनी स्वबळावर मुंबई महानगरपालिकेमध्ये उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत. 30 जागांवर रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार स्वबळावर निवडणुक लढत आहेत. त्यातील 17 जागांची अंतीम यादी आज केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोपवली. त्यातील भाजपच्या कोटयातील 6 ते 7 जागा सोडण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संमती दिली असून तसे निर्देश त्यांनी भाजपचे मुंबई अध्यक्ष अमीत साटम आणि प्रविण दरेकर यांना दिले आहेत. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोटयातीलही रिपब्लिकन पक्षाला हव्या असणा-या 6-7 जागा सोडण्यात येणार आहेत. त्याविषयी एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा होणार आहे. उर्वरित 18 जागांवर रिपब्लिकन पक्ष स्वबळावर निवडणुक लढणार आहे. भाजप शिवसेना कोटयातुन 6-6 अशा 12 जागा रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात येतील. त्या 12 जागांवरील भाजप आणि शिवसेनेचे उमेदवार माघार घेतील. रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना महायुतीचा पाठिंबा राहील. महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून रिपब्लिकन पक्षाचे 12 उमेदवार निवडणुक लढतील. उर्वरित उमेदवार हे रिपब्लिकन पक्षाचे स्वबळावर निवडणुक लढतील.30 जागांच्या व्यतिरिक्त मुंबईतल्या सर्व 197 जागांवर रिपब्लिकन पक्ष भाजप-शिवसेना महायुतीचा प्रचार करेल आणि त्यांना पाठींबा देईल. अशी माहिती ना. रामदास आठवले दिली.

## अंबादेवी संस्थानासाठी ३ एकर ८ आर जमीन; मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

वर्षाच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच बुधवारी राज्य मंत्रिमंडळाची एक महत्त्वाची बैठक पार पडली. निवडणुकीच्या धामधुमीतही ही मंत्रिमंडळ बैठक विशेष लक्षवेधी ठरली, कारण या बैठकीत महसूल विभागाकडून एक महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेण्यात आला.

अमरावती जिल्ह्यातील धार्मिक व सांस्कृतिक वारशाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या श्री अंबादेवी संस्थानास राज्य मंत्रिमंडळाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. अमरावती जिल्ह्यातील मौजे चिखलदरा येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीची सुमारे ३ एकर ८ आर जमीन श्री अंबादेवी संस्थान, अमरावती यांना देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अधिकृत मान्यता देण्यात आली.

ही जमीन हस्तांतरित करण्यामागील उद्देश अंबादेवी संस्थानाच्या धार्मिक, सामाजिक व भाविकांसाठीच्या सुविधांचा विकास करणे हा असल्याचे सांगण्यात आले आहे. चिखलदरा हे विदर्भातील प्रमुख पर्यटनस्थळ असून, तेथे अंबादेवी मंदिरास मोठ्या प्रमाणावर भाविक व पर्यटक भेट देतात. त्यामुळे या जमिनीच्या माध्यमातून संस्थानाला भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यास मोकळा श्वास मिळणार आहे.

दरम्यान, अमरावती येथील श्री अंबादेवी संस्थानकडे चिखलदरा परिसरातील देवी पॉईंट आणि विराट देवी देवस्थानाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित जमीन संस्थानाच्या ताब्यात देण्यात यावी, अशी मागणी श्री अंबादेवी संस्थानने शासनाकडे केली होती. त्यानुसार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यात असलेली सुमारे तीन एकर ८ आर जमीन शासनाकडून अधिकृतपणे जमा करून घेण्यात येणार असून, ती जमीन अमरावती येथील श्री अंबादेवी संस्थानास विनामूल्य प्रदान करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळ वापराविना पडून असलेल्या जमिनीचा योग्य व लोकहितार्थ उपयोग होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# मंत्रिमंडळ बैठकीला मंत्री, अधिकाऱ्यांची दांडी; मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली नाराजी

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

ऐन महानगरपालिका निवडणुकीच्या धावपळीत आणि वर्ष अखेरच्या दिवशी, बुधवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. पण, या बैठकीला खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक कॅबिनेट मंत्र्यांनी दांडी मारली. शिवाय अनेक अधिकारी वर्षअखेरचा मुहूर्त साधून पर्यटनासाठी गेल्यामुळे बहुतांश अधिकाऱ्यांनीही दांडी मारली होती. सर्व दांडी बाहद्दर अधिकारी सुट्टीवर दिसतात, असे म्हणत कमी उपस्थितीवर मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली.

राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. मंगळवार अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे अनेक राजकीय नेत्यांची धावपळ उडाली होती. कॅबिनेट मंत्र्यांसह, राज्यमंत्री आणि अन्य लोकप्रतिनिधींना पक्षाचे एबी फॉर्म दिलेल्यांना अर्ज भरण्यासाठी वेळेत कार्यालयात पाठविण्यासाठी, उमेदवारी नाकारलेल्यांची समजूत काढण्यासाठी प्रचंड धावपळ करावी लागली. नाराजांच्या रोषाला सामोर जाण्याचे प्रकार तर अनेक ठिकाणी घडले.

मुख्यमंत्री म्हणून पदभार स्विकारताच मंत्रिमंडळाला, राज्याच्या कामकाजाला शिस्त लागावी, यासाठी दर आठवड्याला मंत्रिमंडळ बैठक होईल, असे गृहीत धरून मुंबई या, असे फार्मान खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी सोडले होते. त्यानुसार दर आठवड्याला बुधवारी मंत्रिमंडळाची बैठक होते.

आज, झालेल्या बैठकीकडे महानगर पालिकांच्या धापवळीत असलेल्या कॅबिनेट बैठकीकडे पाठ फिरवली. खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही बैठकीला नव्हते. जेमतेम १४ – १५ मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. कॅबिनेट मंत्र्यांची संख्या सुमारे ३५ असताना फक्त १४-१५ कॅबिनेट मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीत घ्यावी लागली. दुसरीकडे मंत्री गैरहजर असताना अधिकाऱ्यांनीही सर्रास दांडी मारली.

विविध विभागांचे सचिव वर्षअखेरीचा मुहूर्त साधत सुट्टीवर गेल्यामुळे बैठकीला अत्यल्प अधिकारी उपस्थितीत होते. मंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या गैर हजेरीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नाराजी व्यक्त केली. हे सर्व दांडी बहाद्दर वर्षअखेरीच्या सुट्टीवर दिसतात, असा प्रकार पुन्हा होऊ नये, असा इशाराही त्यांनी दिला.

राजकीय नेते, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींची मंत्रालयाकडे पाठ

मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात राज्यभरातील राजकीय नेते, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींची गर्दी असते. पण, महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे राजकीय नेते, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी व्यस्त असल्यामुळे त्यांनाही मुंबईकडे पाठ फिरवली. बैठकीनंतर गाठी – भेठी घेण्यासाठी चढाओढ असते. पण, बुधवारी मंत्रालयात शुकशुकाट होता.

# मुंबई अग्निशमन दलाकडून २ हजार ७०३ आस्थापनांची तपासणी, १३६ विरोधात कारवाई

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

नववर्ष निमित्ताने आयोजित स्वागत सोहळ्यांच्या पार्श्वभूमीवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाकडून दिनांक २२ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत मुंबई महानगरात 'विशेष अग्निसुरक्षा मोहीम' हाती घेण्यात आली. या अंतर्गत, मुंबईतील २ हजार ७०३ आस्थापनांची अग्निसुरक्षाविषयक तपासणी करण्यात आली. त्यापैकी, अग्निसुरक्षाविषयक अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याप्रकरणी १३६ आस्थापनांविरोधात कारवाई करण्यात आली. तर, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी रात्री 'जी दक्षिण' विभागाकडून लोअर परळ भागातील कमला मिल व शक्ती मिल परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत ८ अवैध व्यावसायिक एलपीजी सिलिंडर, २०० किलो कोळसा, १३५ लीटर खाद्यतेलासह अन्य सामग्री जप्त करण्यात आली. तथापि, नववर्षाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अग्निसुरक्षेबाबत जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे विविध आस्थापनांनी पालन करावे. तसेच, नागरिकांनी सतर्कतेने स्वागत सोहळा साजरा करावा, असे आवाहन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी केले आहे.

नवीन वर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने मुंबईतील विविध हॉटेल्स्, पब, बार, गृहसंकुल व इमारती, समुद्रकिनारा आदी ठिकाणी विविध कार्यक्रम व स्वागत सोहळ्यांचे आयोजन केले जाते. यासाठी नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येतात. या पार्श्वभूमीवर, अग्निसुरक्षेबाबत अधिक खबरदारी घेण्याच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक



२२ डिसेंबर २०२५ ते दिनांक २८ डिसेंबर २०२५ दरम्यान 'विशेष अग्निसुरक्षा मोहीम' राबविण्यात आली.

तथापि, मोहिमेचा कालावधी संपल्यानंतरही महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य, इमारत व कारखाने, अतिक्रमण निर्मूलन आदी विभागांच्या सहाय्याने मुंबई अग्निशमन दलाकडून विविध आस्थापनांची नियमितपणे तपासणी सुरुच आहे. आस्थापनांनी अग्निसुरक्षेबाबतच्या अटी व शर्तींचे अनुपालन केले नसल्याचे आढळून आल्यास, त्यांच्यावर 'महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६'च्या तरतुदींनुसार कारवाई करण्यात येत आहे. या अंतर्गत, दिनांक २२ डिसेंबरपासून दिनांक ३० डिसेंबर २०२५ दरम्यान २ हजार ७०३ आस्थापनांची कसून तपासणी करण्यात आली. त्यापैकी, अग्निसुरक्षेशी संबंधित अटी व शर्तींचे पालन न करणाऱ्या १३६ आस्थापनांविरोधात कारवाई करण्यात आली. तर, ५५ आस्थापनांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तपासणी करण्यात आलेल्या आस्थापनांमध्ये ३८ मॉल्स, ५१ पंचतारांकित हॉटेल्स, १९४ लॉजिंग-बोर्डिंग, ३७ रूफ टॉप, ३२५ पब, बार, क्लब, ३७ पार्टी हॉल, २८ जिमखाना, १९९३ रेस्टॉरंट आदी मिळून एकूण २ हजार ७०३ आस्थापनांचा समावेश आहे.

दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास 'जी दक्षिण' विभागाकडून लोअर परळ परिसरातील कमला मिल व शक्ती मिल परिसरातील १५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत ८ अवैध व्यावसायिक एलपीजी सिलिंडर, २०० किलो कोळसा, तळघरात साठवून ठेवलेले १३५ लीटर खाद्य तेल, १ ग्रीझलर, ३ मायक्रोवेव्ह ओव्हन, ११ सॉस गॅलन आदी सामग्री जप्त करण्यात आली.

## न्यायमूर्ती शिंदे समितीला पुन्हा मुदतवाढ

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

मराठा समाजाला मराठा -कुणबी, कुणबी -मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी करून प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती विहित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीला पुन्हा सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य सरकारने यापूर्वी शिंदे समितीला दिलेली मुदत आज, ३१ डिसेंबर २०२५ संपुष्टात आली. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी ऑगस्ट महिन्यात मुंबईत आझाद मैदानात आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेटमधील नोंदी तपासून मराठा समाजाला मराठा -कुणबी, कुणबी -मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी शिंदे समितीला मुदतवाढ दिली होती. तरीही सातारा गॅझेटमधील प्राप्त नोंदीच्या अनुषंगाने कार्यवाही अद्याप बाकी असल्याने शिंदे समितीला १ जानेवारी २०२६ पासून पुढे सहा महिने म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

संपूर्ण देशात सत्तेच्या पाठीमागे धावणारे राजकारणी आपण पाहत आहोत. पण 'पुणे तेथे काय उणे' असे म्हटले जात असले, तरी पुण्यात मात्र माजी महापौर प्रशांत जगताप यांनी इतिहास घडविला. त्यांनी चक्क विकलांग झालेल्या काँग्रेसमध्ये प्रवेश करून खरोखरच विचारावर आधारित व तत्वावर आधारित पहिला राजकीय प्रवेश अलीकडच्या काळात करून दाखविला. कम्युनिस्ट विचारांचे लोक तत्त्व पाळतात, हे आपण पाहतोच. परंतु शरद पवार यांना खंबीर साथ देतानाच भाजपला साथ देणाऱ्या अजितदादा बरोबर जाणे पसंत नसल्याने शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून राजीनामा देऊन थेट काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्यांनी तत्व व विचारावर आधारित कार्यकर्ता कसा असतो, हेच जणू महाराष्ट्राला दाखवून दिले. एका बाजूला सारेच राजकीय पक्ष सत्तेकडे फिरकत असताना त्याकडे पाठ करणारे प्रशांत जगताप यांच्यासारखा राजकारणी विरळाच म्हणावा लागेल. विचारांवर राजकारण कालही होत होतं. ते आजही होतंय आणि पुढेही होत राहील. निष्ठेला पायाखाली तुडवत सत्तेच्या परिघात नाचणारांची कितीही गर्दी झाली, तरी निष्ठेवर ठाम राहून आपले पाय तसूभरही थिरकू न देणारेही इथं भेटतील. म्हणूनच राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिला. का दिला? तर भाजपच्या वळचणीला गेलेले अजित पवार यांच्यासोबत पुणे महापालिकेत शरद पवारांचा राष्ट्रवादी युती करणार होती. ही गोष्ट विचारांच्या लढाईत योग्य नाही असं मत जगताप याचं होत. त्यांनी ते मत खा. सुप्रिया सुळे यांना बोलून दाखवलं. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर जगताप यांनी त्यांच्या पक्षाचा राजीनामा दिला. ते पुढे कुठल्यातरी सत्तेच्या मार्गावर जातील असे बोलले गेले, पण त्यांनी खरोखरच विचारावर आधारित प्रवेश करून अजूनही विचारांचे राजकारण जिवंत आहे याचा दाखला दिला. सगळे अधिकार स्थानिक नेत्यांना दिलेत, असे खा. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. याचा अर्थ पुण्यातील निर्णय स्थानिक नेत्यांनी घेतला असा होतो. जर तसे असेल तर शहराध्यक्ष म्हणून सर्व अधिकार प्रशांत जगताप यांनाच असणार ना? मग जगताप यांना वाटलं अजित पवारांसोबत नाही जायचं, त्यांनी त्यांचा निर्णय सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना कळवला असेल. त्यानंतर त्यांचा निर्णय मान्य करायचं तर सोडाच, याउलट त्यांना त्यांच्याच पक्षकडून 'विचार' ऐकावे लागले असतील. मग सहज प्रश्न पडतो की, शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचे विचार पुरोगामी असले तरी त्यांचा पक्ष पुरोगामी कसा होऊ शकतो? प्रशांत जगताप यांच्यासारख्या नेत्याची आयुष्यातली २५ वर्षे एका विचारांवर, विवेकावर आणि नेत्याच्या शब्दावर खर्ची पडली आहे. कधीही पक्ष बदल करण्याचा मोह त्यांना आजपर्यंत झाला नाही. त्यांचा इतिहास लोकांना माहीत असल्यामुळे ते आमदार व पुण्याचे महापौर देखील झाले. एका कार्यकत्यार्ला वाटणार मत त्यांनी पक्षाच्या वरिष्ठांकड मांडूनही उपयोग होत नसेल तर 'त्या' पक्षात ते थांबतीलच कसे?

# 'पुणे तेथे काय उणे'!





थर्ड अम्पायर

जयंत महाजन

९४२०६११४२०

राष्ट्रवादी हे आमचं कुटुंब आहे, असं पक्षाकडून सांगितले जाते. म्हणजे एकीकडं कुटुंब म्हणायचं आणि कुणीतरी तत्वावर, विचारांवर बोट ठेऊन रागावले कींवा त्यांची भूमिका मांडली तर त्याला 'हे काही घर नाही' म्हणून बाजूला सारायचं.

सगळ्यात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, २५ वर्ष पक्षाशी, शरद पवारांशी आणि विचारांशी प्रामाणिक असलेला कार्यकर्ता पक्ष सोडून जाण्याची भूमिका का घेतो याचा विचार करण्याची गरज होती. अनेकांना वाटत शरद पवार पुरोगामी विचारांचे आहेत. पण पुरोगामीपणाची शाल पांघरून राजकारण करणारे खतरनाक असतात. कारण शरद पवारांच्या राजकारणाची सुरुवातच मुळात भाजपला सोबत घेऊन झालेली आहे.

चेहरा पुरोगामीचा पण कृती मात्र प्रतिगामींची हे अनेकदा सिद्ध झाले आहे. वसंतदादा पाटील यांचं सरकार पाडून 'पुलोद'चा प्रयोग करतांना जनसंघाला सोबत घेऊनच झाला. त्यावेळी संघ विचारांचे लोक पवारांच्या मंत्रिमंडळात होतेच. उत्तमराव पाटील, हशू अडवाणी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर कार्यकर्ते होते. त्यांना पहिल्यांदा मंत्री कुणी केलं तर स्वतःला पुरोगामी म्हणणाऱ्या शरद पवारांनीच.

सरकार कुणाचं पाडलं तर एका अस्सल पुरोगामी विचारांच्या वसंतदादा पाटलांचं. म्हणजे, सत्तेची आणि लवकरात लवकर मुख्यमंत्री होण्याची पवारांची घाई आता लक्षात घेतली पाहिजे. हा सर्व प्रकार पवारांनी तारूण्यात असतांना केला होता. ज्यांच्या राजकारणाची सुरुवातच अशी झाली असेल तर त्याचा पुढचा अंक कसा असेल याचा अंदाज केलेलाच बरा.

काँग्रेसच्या विरोधात पुलोद म्हणून निवडणूक लढवली त्यामध्येही भाजप होती. काँग्रेस त्यावेळी जिंकली, पण तेव्हाही पवारांनी पुरोगामी नावच वापरले. भाजपलाही अशावेळी कुणीही पुरेगामी चालतो. शरद पवार अनेकदा त्यांच्या बरोबर राहिले आहेत.

आता तर महाराष्ट्रात तसं काही राहिलंच नाही. कोणत्या विचारसरणीचे लोक कोणाबरोबर जातात, याचा भाजपच्याही लोकांना अंदाज नाही. विचारांवर निवडणुका लढणाऱ्या कार्यकर्त्यांवर हे घावच असतात. प्रशांत जगताप यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करताना आपली भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले की, 'ज्या काँग्रेस पक्षाला शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आहे. तसंच गांधी आणि नेहरुंची विचारधारा आहे. त्या पक्षात मी सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काळात पुण्यामध्ये काँग्रेसला पुन्हा एक नंबरला आणून महाराष्ट्रात आणि पुण्यात भाजपनं जे काही लुटलेलं आहे त्याला विरोध करणारा प्रमुख पक्ष म्हणून काँग्रेस कसा उभा राहील यासाठी मी प्रयत्न करेन'. आता अशा व्यक्तीला पाठिंबा देण्याऐवजी त्यांना चार गोष्टी सुनावण्याचा काँग्रेसचा प्रकार पाहिल्यावर काँग्रेसची बुडती नाव लवकर वर येईल, असे वाटत नाही.

## काँग्रेस पक्ष सुधारणार तरी कधी?

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष राहिलेले प्रशांत जगताप यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करताच पुणे काँग्रेसमधील काही नेत्यांना ते अडचणीचे वाटू लागले. त्यामुळं उघडपणे जगताप यांच्याविरोधात काँग्रेसच्या नेत्यांनी भूमिका घेत त्यांच्या पक्ष प्रवेशाचं स्वागत केलं असलं तरी काहीसा विरोधाचाही सूर लावला. आपल्या नाराजी मागचं कारणही या नेत्यांनी स्पष्ट केलं आहे. काय तर म्हणे प्रदेश काँग्रेसकडून शहरातील काँग्रेस नेत्यांना विश्वासात घेतलं गेलं नाही, पक्ष प्रवेशाच्या प्रक्रिया डावलत प्रशांत जगताप यांना प्रवेश दिल्याचा आरोप काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केला. त्याचबरोबर जगताप यांनी आतातायीपणे काँग्रेसमध्ये निर्णय घेऊ नये, अशा शब्दांत घरचा आहेरही त्यांनी दिला आहे. प्रशांत जगताप यांनी ज्या पद्धतीने राष्ट्रवादी पक्षाचे पद सोडले, त्याचे त्यांच्या पक्षाऐवजी काँग्रेसलाच अप्रूप वाटले. ज्या आततायी पद्धतीनं त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचं शहराध्यक्षपद सोडलं ते योग्य नाही, असे काँग्रेसवालेच म्हणू लागले. जर एखाद्या पक्षाला निर्णय सांगण्यात आपण अपयशी ठरलो, तर लगेच एखादी टोकाची भूमिका घ्यायची नसते. आपल्यामध्ये कला असली पाहिजे आपल्या नेत्याचं मन वळवण्याची. जर ती आपल्यात नसेल आणि जर आपण आतातायीपणानं निर्णय घेतला तर तुम्ही कोणत्याही पक्षात गेलात तर ते अडचणीचच होणार, अशा शब्दांत स्थानिक नेते अरविंद शिंदे यांनी प्रशांत जगताप यांच्या काँग्रेस प्रवेशावर भूमिका मांडली. ज्या पक्षाचे देशभर पानिपत होत आहे, त्या पक्षात कुणीतरी येत आहे, त्याचे स्वागत करण्याऐवजी अपशकुन करण्याचा प्रकार पाहिल्यावर काँग्रेस पक्ष सुधारणार तरी कधी? असा प्रश्न सहज पडतो.

# सत्तेसाठी पक्षनिष्ठेचा खेळखंडोबा

मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका यंदा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तेसाठी मर्यादित राहिलेल्या नाहीत. या निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवे, अस्वस्थ करणारे वास्तव समोर आणले आहे, ते म्हणजे पक्षनिष्ठेचे झिजलेले स्थान आणि जिंकण्याच्या हमीने व्यापलेली राजकीय मानसिकता.

राज्याच्या इतिहासात प्रथमच महापालिका निवडणुकांना इतके राजकीय वजन आले आहे की, या लढतींनी थेट पक्षसंघटनांची ताकद, नेतृत्वाचा आत्मविश्वास आणि विचारधारेची शाश्वतता प्रश्नांकित केली आहे.

यंदाच्या निवडणुकांमध्ये जे घडले, ते अभूतपूर्व आहे. बंडखोरीच्या भीतीने सर्वच पक्षांनी उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्याऐवजी थेट एबी फॉर्म देण्याचा मार्ग स्वीकारला. बंद दरवाजामागे उमेदवारी ठरवणे, शेवटच्या क्षणापर्यंत नावं गुप्त ठेवणे हे सारे प्रकार केवळ तांत्रिक नव्हे, तर राजकीय अविश्वासाचे लक्षण आहेत. लोकशाहीत उमेदवार निवडण्यापेक्षा उमेदवार रोखणे अधिक महत्त्वाचे ठरू लागले, ही बाब चिंताजनक आहे.

पक्षप्रमुखांनी स्वीकारलेली ही पद्धत एक स्पष्ट संदेश देते–पक्षाला आता स्वतःच्या माणसांवरही पूर्ण विश्वास उरलेला नाही. तिकीट न मिळाल्यास हा बंड करेल का?, हा खरंच निवडून येईल का? या दोन प्रश्नांनी पक्षनेतृत्वाला ग्रासले आहे. यातून उमेदवाराची निष्ठा नव्हे, तर त्याची विनयशीलता आणि धोका न निर्माण करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची ठरते आहे. परिणामी, राजकारणात विचारधारेपेक्षा अंकगणिताला अग्रक्रम मिळतो आहे.

या प्रक्रियेत सर्वाधिक नुकसान झाले आहे ते निष्ठावंत कार्यकर्त्यांचे. वर्षानुवर्षे संघटन बांधणारे, पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात पुढे असणारे, मतदारांशी रोजचा संबंध ठेवणारे कार्यकर्ते अनेक ठिकाणी डावलले गेले.

त्यांच्या जागी जिंकू शकतो या एकमेव निकषावर चेहरे निवडले गेले. ही निवडणूक जिंकण्याची शहाणपणाची रणनीती असू शकते, पण पक्षसंघटनेच्या दीर्घकालीन आरोग्यासाठी ती घातक ठरते.



दिपक कैतके
मुंबई.

अधिक गंभीर बाब म्हणजे, सत्तेत असलेल्या पक्षांनाही उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्याचे धाडस झाले नाही. सत्ता हातात असूनही जर नेतृत्वाला स्वतःच्या संघटनेवर विश्वास ठेवता येत नसेल, तर ती सत्ता नेमकी कशावर उभी आहे, हा प्रश्न उभा राहतो. संघटनेची मुळे खोलवर रुजलेली असतील, तर अशा गुप्त, तातडीच्या आणि भयग्रस्त निर्णयांची गरजच भासत नाही.

यंदाच्या निवडणुकांनी स्पष्टपणे दाखवून दिले आहे की निष्ठा हरली आणि अंकगणित जिंकलं. निष्ठा, विचारधारा, पक्षासाठीची तपश्चर्या या संकल्पनांना आजच्या राजकारणात दुय्यम स्थान मिळाले आहे. त्याऐवजी विनाबंडखोरी, विनाधोका आणि जिंकण्याची शक्यता, हाच निकष उरला आहे. परिणामी, बंडखोरी वाढली, पक्षांतरांचे राजकारण वेग घेतले आणि स्थानिक पातळीवर संधीसाधूपणाला खतपाणी मिळाले.

ही लढत आता केवळ प्रभाग किंवा वॉर्ड जिंकण्यापुरती उरलेली नाही. ही निवडणूक पक्षीय आत्मविश्वासाची, संघटनात्मक टिकावाची आणि लोकशाही मूल्यांची कसोटी बनली आहे. आज बंडखोरी टाळण्यासाठी केलेल्या तडजोडी उद्या संघटना पोखरण्याचे कारण ठरू शकतात, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न उरतो तो मूलभूत, पक्ष टिकवायचा की सत्ता मिळवायची? सत्ता मिळवण्यासाठी जर पक्षनिष्ठेलाच किंमत उरणार नसेल, तर उद्याच्या राजकारणात पक्षसंघटनांचा पाया नेमका कशावर उभा राहणार? निवडणुकांचे निकाल काही दिवसांत लागतील आणि कोण जिंकले-हरले याचा तात्कालिक हिशेब मांडला जाईल. मात्र यंदाच्या महापालिका निवडणुकांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला दिलेला धक्का दीर्घकाळ जाणवणार आहे.

कारण यंदा लढत केवळ सत्तेसाठीची नाही, ती पक्षनिष्ठा आणि सत्तेच्या हव्यासातील संघर्षाची आहे आणि या संघर्षात सत्ता जिंकली जाऊ शकते, पण विश्वास हरवला तर राजकारणाचे भवितव्यच धोक्यात येते.... हा इशारा यंदाच्या निवडणुकांनी स्पष्टपणे दिला आहे.

# देशपातळीवर खेळाडू घडविणारे क्रीडा प्रशिक्षक सचिन कांबळे



देशामध्ये पालकांची खेळाप्रती असलेली उदासीनता आणि पाल्यांना मिळणारे अपुरे प्रोत्साहन अशा सामाजिक पार्श्वभूमीवर हॉकी या खेळाविषयी गोडी निर्माण करून त्याच्या प्रचार व प्रसारात मोठे योगदान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय पातळीवर हॉकी स्पर्धेत तीन वेळा सहभागी झालेले क्रीडा शिक्षक सचिन कांबळे यांनी केले आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात शेकडो खेळाडूंना राज्य पातळीवर, देश पातळीवर खेळविले आहे, त्यांना यश संपादन करून दिले आहे. आज राज्यातल्या टॉप असणाऱ्या दहा क्रीडा शिक्षकांमध्ये कांबळे सर यांचे अव्वल स्थान आहे.

--------------------

वडील पोलिस खात्यात असल्याने चार ऑलिंपिक आणि चार विश्वचषक जिंकलेले धनराज पिल्ले जिथून घडले, अशा पुण्यातील खडकी या गावाशी त्यांचा संपर्क आला. हॉकीचे माहेरघर असलेल्या या गावात अनेक हॉकी खेळाडू घडत होते. या पोषक वातावरणाचा सचिन कांबळे यांच्यावर प्रभाव पडला आणि त्यांच्यात या खेळाविषयी आकर्षण निर्माण झाले. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षीच त्यांनी या खेळात आयुष्य घडविण्याचे ठरविले.

भारतीय संघात खेळण्याचे स्वप्न बाळगून सचिन यांनी या खेळासाठी आवश्यक सर्व नैपुण्य आत्मसात करत कठोर मेहनत घेत १८ वर्षांखालील पुणे विद्यापीठाची देशपातळीवरील पहिली स्पर्धा जिंकली. अशा तऱ्हेने त्यांच्या कारकिर्दीची यशस्वी घोडदौड सुरू झाली.

मात्र, हा प्रवास सुरू करताना आलेला एक कटू अनुभव ते सांगतात. १४ वर्षांखालील बेंगळुरू नॅशनल हॉकी स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली होती. त्यासाठी ते रोज ४ ते ५ किलोमीटर धावायचे. खेळाचा आवश्यक अभ्यास करून त्यांनी कौशल्य प्राप्त केले होते.

पण ऐनवेळी राजकीय दबावातून त्यांचे नाव रद्द करण्यात आले. ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. त्यांच्या आईनेही खेळ सोडून अभ्यासाकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला. मात्र या खेळालाच वाहून घेण्याचा त्यांचा निर्णय ठाम होता. आज १६ ते १७ वर्षांपासून ते क्रीडा क्षेत्रात कार्यरत असून आपल्या कारकिर्दीत ते राष्ट्रीय पातळीवर तीन वेळा, तर विद्यापीठ स्पर्धांमध्ये दोन वेळा सहभागी झाले आहेत. हॉकी महाराष्ट्र असोसिएशनमध्ये त्यांनी राष्ट्रीय पंच म्हणून बारा वर्षे सेवा दिली असून सातारा जिल्हा क्रीडा विभागातही त्यांचा सहभाग आहे.

खेळासाठी संघर्ष करत असताना खेळाडूंची परिस्थिती त्यांनी जवळून अनुभवली होती. विद्यार्थ्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, याची त्यांना जाणीव होती. यातूनच उदयन्मुख खेळाडूंसाठी आपले काही देणे लागते, या प्रेरणेतून आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी त्यांनी बी.पी.एड. पूर्ण केले. पुण्यातील सैनिक शाळेपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास अखंडपणे पाचगणी येथील संजीवन विद्यालयात क्रीडा शिक्षक म्हणून सुरू आहे.

संजीवन विद्यालय ट्रस्टच्या अध्यक्ष शालिनीताई या आज वयाच्या ९३ व्या वर्षीही अपार उत्साहाने या संस्थेच्या अध्यक्षपदावर कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि प्रोत्साहनातून शाळेच्या निसर्गरम्य २२ एकर कॅम्पसमध्ये आठ एकर फुटबॉल व हॉकी मैदान, ४०० मीटर अथलेटिक्स ट्रॅक, ६०० मीटर नैसर्गिक ट्रेक, २५ मीटर स्विमिंग पूल, क्रिकेट मैदान, नेट प्रॅक्टिस क्षेत्र, जिम, बास्केटबॉल आर्टिफिशियल कोर्ट, चारशे लोकांसाठी क्रीडा वसतिगृह अशी सुसज्ज आणि पोषक क्रीडा सुविधा उभारण्यात आली आहे.

आपल्या शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध शिकवणुकीतून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नैपुण्यसमृद्धता निर्माण केली असून जिंकण्याची मनोवृत्ती रुजवली आहे. त्यांच्या या समर्पणातून १६ ते २० खेळाडू राष्ट्रीय पातळीवर व ३०० ते ३५० विद्यार्थी राज्य पातळीवर खेळले आहेत.



माणूसपणाची पाऊलवाट

सुजाता बंडावार

अक्षय कुमारच्या गोल्ड चित्रपटात त्यांचे दोन विद्यार्थी झळकल्याची गोष्ट ते अभिमानाने सांगतात. खेळात आवड असलेल्या ३५ ते ४० वयोगटातील ज्येष्ठ क्रीडाप्रेमींसाठी ते स्पर्धांचे आयोजन करतात. विभागीय, राज्य आणि शासनस्तरीय स्पर्धांमध्ये ते पंच म्हणूनही कार्य करतात.

त्यांच्या या मेहनतीची पावती म्हणून २००८ साली त्यांना लोकसेवा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००५ साली ऑल इंडिया विद्यापीठ हॉकी स्पर्धा आणि २००४ साली कुमार गट राष्ट्रीय स्पर्धा त्यांनी जिंकल्या आहेत. एनसीसी अधिकारी म्हणूनही ते कार्यरत आहेत. सचिन सर यांनी देशभरात शेकडो विद्यार्थी घडवले आहेत, ते खेळासोबत सर्वांनी प्रेमाने नाते जोडावे असे सांगितले आहे.

सचिन सर म्हणतात, खेळाविषयी पालकांमध्ये असलेली उदासीनता आता कमी होत आहे. शासन पातळीवर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रावीण्य मिळविणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये थेट नियुक्ती मिळत आहे.

ते अंतःकरणातून सांगतात की प्रत्येक खेळाडूचा पहिला गुरु हा त्याच्या शाळेतील क्रीडा शिक्षक असतो. या क्रीडा शिक्षकाने मिळणाऱ्या पगाराच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमधील खेळ कौशल्य ओळखून त्याला घडविण्यासाठी अपार मेहनत घेतली पाहिजे.

खेळामध्ये शारीरिक सुदृढतेसोबतच मजबूत मानसिकता निर्माण करण्याची गरज आहे. कारण येथे मिळणारे यश सहज नसते. अपयश आले तरी खेळ संपत नाही आणि आयुष्य थांबत नाही, हे विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून आत्महत्येसारख्या विचारांपासून त्यांना परावृत्त केले पाहिजे. आज खेळाला चांगले दिवस आले असले तरी खेळ संघटना आणि होतकरू विद्यार्थ्यांना सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळण्याची गरज आहे.

देश व राज्य पातळीवर खेळण्यासाठी तयार असलेल्या विद्यार्थ्यांना त्या त्या मैदानांशी जुळवून घेण्यासाठी दीड ते दोन महिने निवासी सरावाची सुविधा द्यायला हवी. गल्लीबोळीत खेळला जाणारा क्रिकेट जसा सर्वांना उमगला, तसाच हॉकी खेळ गाव पातळीवर पोहोचण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये मैदाने तयार झाली पाहिजेत.

ज्या खेळामुळे मला अर्थसहाय्य मिळाले आणि आज माझे घर चालते, त्या खेळाप्रती कृतज्ञता व्यक्त करत ते सांगतात की लवकर निवृत्ती घेऊन होतकरू विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ कार्य करायचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाची महत्त्वाची भूमिका असून खेळामुळे त्यांच्यात जिद्द, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्ती निर्माण होते. त्यामुळे पालकांनी अभ्यासासोबतच खेळालाही महत्त्व द्यावे, असे आवाहन सचिन सर यांनी केले आहे. त्यांचा खेळाडू घडविण्याचा हा प्रवास असाच अखंडपणे सुरू राहो, यासाठी आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**सचिन कांबळे संपर्क क्र. 9860164066**

# नव्या वर्षासाठी नवा संकल्प!



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नववषार्चे स्वागत करताना आपल्यापैकी अनेक जण आत्मचिंतन करतात. सरत्या वर्षासाठी आपण कोणकोणते संकल्प केले होते, त्यापैकी किती पूर्ण झाले आणि किती शेष आहेत, केलेले संकल्प पूर्ण न होण्यामागे नक्की कोणकोणते अडथळे आले आणि त्यासोबतच येणाऱ्या वर्षात आपल्याला कोणकोणती शिखरे किती काळात गाठायची आहेत, अडचणींवर कशाप्रकारे मात करायची आहे याचे गणित मांडतात.

हे संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला काय काय प्रयत्न करावे लागणार आहेत याची जंत्री बनवतात. प्रतिवर्षी केले जाणारे हे संकल्प बऱ्याचदा व्यावहारिक स्वरूपाचे असतात. विद्यार्थी एखादी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचा संकल्प करतात, व्यावसायिक आपल्या व्यवसायात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्याचा, व्यवसाय वाढवण्याचा संकल्प करतात, कार्यालयीन कर्मचारी कार्यालयात प्रमोशन आणि वेतनवृद्धी मिळवण्याच्या दृष्टीने संकल्प करून त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची सूची बनवतात, नवीन गाडी, घर किंवा एखादी महागडी वस्तू विकत घेण्याचा संकल्प करतात, स्त्रीवर्ग येत्या वर्षात नवीन दागिना, वस्तू विकत घेण्याचा, पैसे बचतीचा संकल्प करतात. दरवर्षी केले जाणारे हे संकल्प पुढील काही दिवस आपल्या प्रयत्नांना ऊर्जा देण्याचे कार्य करतात.

आपल्यापैकी किती जण वर्षाअखेरीस आपल्यात असलेल्या आणि वर्षभरात वाढलेल्या दोषांचे चिंतन करतात आणि हे दोष घालवण्यासाठी, आपल्यात नसलेले गुण आणण्यासाठी आणि अल्प प्रमाणात असलेल्या गुणांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करतात? आपल्यामध्ये अनेक दोष आहेत. यामुळे अनेकदा नुकसान होते, चुकीचे निर्णय घेतले जातात. मात्र या दोषांची सूची बनवून येणाऱ्या वर्षात हे दोष कमी करण्यासाठी आणि सोबत आपल्यात नवनवीन गुण आणण्याच्या दृष्टीने आपण संकल्प करतो का ?

यंदा असा संकल्पही करून पाहूया. दोषासोबत आपल्याला असलेला चुकीच्या सवयी, व्यसने यांची सूची बनवूया आणि त्यासाठी कोणकोणते प्रयत्न करायला हवेत, कोणाकोणाचे साहाय्य घ्यायला हवे हेही लिहून काढू.

आपले शारिरिक आणि मानसिक आरोग्य हे सर्वस्वी समाजावर अवलंबून आहे. त्यामुळे तो निरोगी, सुदृढ आणि सशक्त असणेही तितकेच महत्वाचे आहे.

भ्रष्टाचार, गुंडगिरी, स्त्रियांवरील अत्याचार, लहान मुलांचे शोषण, जातीपातीतील तंटे, तरुणांमधील व्यसनाधीनता, प्रमुख शहरांना पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा,ऑनलाईन गेमिंग ॲप्सना बळी पडत चाललेली तरुणाई, टीव्ही आणि गेम्स आदींच्या नादात लहान मुलांचे हरवत चाललेले बालपण, फास्ट फूड-जंक फूड आदीच्या आहारी गेल्यामुळे वाढत चाललेली आजारपणे, भाज्या-फळे, धान्य, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने यांमधील भेसळ, अन्नपदार्थांत वाढत चाललेला रसायनांचा वापर, बनावट औषधाचे वाढते स्तोम, घरभेदी सिरीयल्स, अश्लील-हिंसक वेबसिरीज आणि चित्रपट, मोबाईल मध्ये गुंतत चाललेले जीवन या सर्वांचा परिणाम म्हणून हरवत चाललेला सुसंवाद, पसरत चाललेली विश्वासघातकी वृत्ती यांसारख्या अनेक समस्या भेडसावत आहेत.

यासाठी राजकीय मंडळी किंवा सरकार काही करेल ही अपेक्षा करण्यापेक्षा या सर्वांच्या निर्मूलनासाठी मीं काय करू शकतो याचा विचार सरत्या वर्षाला निरोप देताना प्रत्येकाने करायला हवा.

## वाचक लिहितात

### माणसाच्या निष्काळजीपणाचे भयावह दर्शन

नाणूस, वाळपई येथील जय श्रीराम अखिल गोमंतक गोसंवर्धन केंद्रात घडलेली घटना अंतर्मुख करणारी आहे. एका गायीच्या पोटातून तब्बल ४८ किलो ३०० ग्रॅम प्लास्टिक, पीव्हीसी पाईपचे तुकडे, चामड्याचा पट्टा, जुने रेनकोट, कापड, नायलॉन दोऱ्या व धातूची वायर शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आली. गोव्यातील अशा प्रकारची ही पहिलीच विक्रमी शस्त्रक्रिया मानली जात आहे. रस्त्यावर टाकलेला कचरा, विशेषतः प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले अन्न, गायी नकळत खातात आणि त्याचे दुष्परिणाम त्यांच्या जीवावर बेततात, याचे हे जिवंत उदाहरण आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे गायीचा जीव वाचला असला, तरी मानवी निष्काळजीपणा आणि प्लास्टिक कचऱ्याचे वाढते संकट यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

ही घटना केवळ एका गायीपुरती मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षण, कचरा व्यवस्थापन आणि मूक प्राण्यांबद्दलची आपली जबाबदारी याची जाणीव करून देणारी आहे. रस्त्यावर कचरा टाकणे थांबवणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे, हाच अशा दुर्दैवी घटनांना आळा घालण्याचा खरा मार्ग आहे.

■ सौ.रमा देशमुख, नागपूर.

# भिजवलेल्या तांदळाचे आरोग्यदायी फायदे



तांदूळ हे भारतीय खाद्य पदार्थातील मुख्य अन्न आहे. अनेकांना तर भाताशिवाय पोटही नसते. आपल्या आहारात तांदूळ खूप महत्त्वाचा आहे, डोसापासून रात्रीच्या जेवणापर्यंत भात आवश्यक झाला आहे.

तथापि, आजच्या काळात लोक जास्त घाईत आहेत आणि तांदूळ व्यवस्थित शिजवत नाहीत, ज्यामुळे तांदळाच्या फायद्याऐवजी शरीराचे नुकसान होऊ लागते. आपले पूर्वज स्वयंपाक करण्यापूर्वी काही काळ तांदूळ पाण्यात भिजत असत. ही केवळ चव किंवा सवयीची बाब नाही, तर हा एक स्वस्थ मार्ग आहे. आजच्या काळात अनेकांना तांदूळ धुण्याची आणि थेट शिजवण्याची घाई असते, परंतु तांदूळ पाण्यात भिजवण्यामागे अनेक गुणधर्म लपलेले असतात.

भातामध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण भरपूर असते, जे शरीराला झटपट ऊर्जा पुरवण्याचे काम करते. विशेषतः शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांसाठी भात हा ऊर्जेचा मुख्य स्रोत आहे. तांदूळ हा नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त असतो, त्यामुळे ज्यांना गव्हाची किंवा ग्लूटेनची ॲलर्जी आहे, त्यांच्यासाठी भात हा एक सुरक्षित आणि उत्तम पर्याय ठरतो. ब्राऊन राइस आणि हातसडीचा तांदूळ हे सर्वात फायदेशीर मानले जातात.

तांदळावर जास्त प्रक्रिया केल्यामुळे त्यातील पोषक घटक आणि फायबर निघून जातात. ब्राऊन राइसवर प्रक्रिया कमी केलेली असते, यामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते, जे पचनक्रिया सुधारण्यास आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करण्यास मदत करते.

भात पचायला हलका असतो, त्यामुळे पोटाच्या तक्रारी किंवा आजारपणात डॉक्टर भात खाण्याचा सल्ला देतात. भातामधील पोषक घटक पचनसंस्था सुरळीत ठेवण्यास मदत करतात.

भातामध्ये कोलेस्टेरॉल, सोडियम आणि फॅट्सचे प्रमाण नगण्य असते, ज्यामुळे तो हृदयाच्या आरोग्यासाठी पोषक ठरतो. ब्राऊन राइस किंवा हातसडीचा तांदूळ यामध्ये फायबर आणि जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात असतात, जे वजन नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तातील साखर संतुलित राखण्यास मदत करतात.

योग्य प्रमाणात आणि योग्य वेळेत भाताचे सेवन केल्यास शरीराची चयापचय क्रिया सुधारते. तांदूळ पाण्यात भिजवून ठेवल्याने त्यात असलेल्या फायटिक ॲसिडची पातळी कमी होते. हे फायटिक ॲसिड शरीराला लोह, कॅल्शियम आणि जस्त सारख्या आवश्यक खनिजे शोषून घेण्यापासून प्रतिबंधित करते. भिजवण्याने हा अडथळा काही प्रमाणात कमी होतो.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### नववर्ष स्वागतम्..!

रचाया उज्वल
भविष्याचा पाया
विचारांती दुरदृष्टीचे
संकल्प करू या ...!

संकल्पांना दिली, जिद्दीने
निरंतर प्रयत्नांची साथ
तर स्वप्नपुर्तीचा आनंद
मावणार नाही गगणात..!

प्रयत्नांती परमेश्वर
हे तत्व ठेवावे ध्यानी
आज नाही तर उद्या यश
मिळेल चिंता नको मनी..

# निवडणूक कामासाठी शेकडो डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना सक्ती

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामासाठी जुंपू नये, असे निवडणूक आयोगाचे स्पष्ट निर्देश असतानाही मुंबईत सर जे.जे. समूह रुग्णालयांच्या डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना पालिका निवडणूक कामासाठी सक्ती केली जात आहे. मुंबई पालिकेने तसे आदेश दिले असून सर्व डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना त्यासंदर्भात मेसेजही पाठवले जात आहेत. आश्चर्य म्हणजे पालिका रुग्णालयांतील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना यातून सूट देण्यात आली असून फक्त जे. जे. रुग्णालयासाठी निवडणुकीचे काम बंधनकारक करण्यात आल्याचे सांगितले जाते. परिणामी जे.जे. रुग्णालयातील रुग्णसेवा व अध्यापनाचे काम कोलमडण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाच्या ७जून २०२३ च्या सूचनेनुसार, वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर व परिचारिका यांना निवडणूक कामाकरता सूट देण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. सर जे.जे. समूह रुग्णालयांमध्ये महाराष्ट्राच्या

कानाकोपऱ्यातून रोज हजारो गोरगरीब गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. तसेच रुग्णालयाच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रम, डी. एम.एल.टी. व प्रथम वर्ष एम.बी.बी. एस. प्रवेश प्रक्रिया सुरू आहेत. डॉक्टर्स, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि कर्मचारी वर्ग त्या कामात सातत्याने व्यस्त असतो. त्यांना निवडणुकीच्या कामाला सक्तीने जुंपले गेले, तर रुग्णसेवा आणि अध्यापनाच्या कामावर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे.

सर जे.जे. समूह रुग्णालयातील डॉक्टर्स, परिचारिका, वैद्यकीय तपासण्या करणारे तंत्रज्ञ, फिजिओथेरपिस्ट, महाविद्यालयाचे प्रशासकीय काम पाहणारा कर्मचारी वर्ग अशा १३४ जणांना निवडणूक कामासाठी हजर राहण्याचे आदेश मुंबई महापालिकेचे प्रशासक व आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. त्यासंदर्भात सर्वांना वैयक्तिक मेसेजही पाठवण्यात येत आहेत. जे. जे. समूह रुग्णालयातील एकट्या जे. जे. रुग्णालयात १,८०० खाटा आहेत. सध्याच्या घडीला तिथे १,७०० रुग्ण दाखल आहेत.

जे. जे. रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स व रुग्णसेवेशी निगडित इतर कर्मचाऱ्यांचे निवडणूक कामाचे आदेश त्वरित रद्द करावेत, अशी विनंती जे. जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय भंडारवार यांनी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्राद्वारे केली आहे. सद्यस्थितीत जे. जे. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयामध्ये कर्मचारी वर्ग अल्प आहे. त्यामुळे रुग्णसेवेत बाधा येऊ शकते, असे भंडारवार यानी म्हटले आहे.

# पालिकेतील ओएसडी चौरे यांना मुदतवाढ नाही

## उपायुक्तांनी पुकारले होते बंड; पात्र अधिकाऱ्यांवर झाला होता अन्याय

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या आयुक्त कार्यालयातील ओएसडी अखेर ३१ डिसेंबरपासून पायउतार होणार आहेत. सेवानिवृत्तीनंतरही विशेष कार्यकारी अधिकारी पदावर या अधिकाऱ्याला नियुक्त केल्यामुळे मुंबई महापालिकेतील सर्व अधिकाऱ्यांनी बंडाचा झेंडा उचलला होता. पालिकेतील सर्व १५ उपायुक्तांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र लिहून ओएसडींना हटवण्याची मागणी केली होती. त्यानंतर सहाय्यक आयुक्तांनीही उपायुक्तांच्या या बंडाला पाठिंबा दिला होता. या ओएसडींची मुदत ३१ डिसेंबरला संपत असून त्यांना मुदतवाढ देण्यात आली नाही.

पालिकेच्या आयुक्त कार्यालयाचे सहआयुक्त चंद्रशेखर चौरे हे गेल्या वर्षी १ जानेवारी २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले होते. मात्र, चौरे यांना मुंबई महापालिकेत आयुक्त कार्यालयातच विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यांच्या नियुक्तीमुळे पालिकेतील उपायुक्तांमध्ये त्यावेळीही नाराजी पसरली होती. चौरे यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केल्यामुळे त्या पदासाठी पात्र असलेल्या अधिकाऱ्यांवर हा अन्याय असल्याची भावना निर्माण झाली होती. त्यामुळे गेले वर्षभर पालिकेच्या अधिकाऱ्यांमध्ये या विषयावर दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. मात्र, येत्या ३१ डिसेंबरला चौरे यांचा एक वर्षाचा कालावधी संपणार आहे. त्यांना पुन्हा मुदतवाढ मिळू नये म्हणून मुंबई महापालिकेतील उपायुक्त पदावरील सर्व अधिकारी प्रथमच एकवटले होते.

या सर्व १५ उपायुक्तांनी मिळून एक खरमरीत पत्र लिहिले असून हे पत्र पालिका आयुक्त भूषण गगराणी आणि सामान्य प्रशासन विभागाचा कार्यभार असलेल्या अश्विनी जोशी यांना पाठवले होते. या पत्रामुळे पालिका प्रशासनात खळबळ माजली होती. उपायुक्तांच्या या बंडानंतरही चौरे यांना हटवण्याबाबत हालचाल होत नव्हती. त्यामुळे पालिकेच्या २० सहाय्यक आयुक्तांच्या स्वाक्षरीसह पत्र देऊन उपायुक्तांच्या बंडाला पाठिंबा दिला होता. अधिकाऱ्यांच्या या बंडानंतरही चौरे यांना मुदतवाढ देणार की नाही याबाबत अनिश्चितता होती.

# आचारसंहितेमुळे वांद्रे स्कायवॉकचे लोकार्पण रखडले

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

सर्व निवडणूक आचारसंहितेच्या कारणास्तव स लोकोपयोगी कामे रखडलेली असताना त्यात वांद्रे स्कायवॉकचीही भर पडली आहे. ३१ डिसेंबरपर्यंत काम पूर्ण होऊन नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच हा स्कायवॉक सुरू होणे अपेक्षित असताना अद्याप येथील काही कामेही शिल्लक आहेत.

वांद्रे पूर्व येथे म्हाडा, एमएमआरडीए, कुटुंब न्यायालय, लघुवाद व दंडाधिकारी न्यायालय, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अशी महत्त्वाची कार्यालये रेल्वे स्थानकापासून जवळच्या अंतरावर आहेत. या कार्यालयांत तसेच वांद्रे-कुर्ला संकुल या व्यावसायिक केंद्रात



दररोज हजारो नागरिक ये जा करतात. रेल्वे स्थानकापासून जवळ असणाऱ्या कार्यालयांपर्यंत पायी जाण्याकडे त्यांचा कल असतो. मात्र रेल्वे स्थानकाच्या बाहेर अनधिकृत रिक्षांची प्रचंड गर्दी असते. तसेच स्थानकापासून ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंतच्या रस्त्यावर झोपडपट्टी आहे. ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषणामुळे पादचाऱ्यांना प्रचंड मनःस्ताप होतो.

गेले अनेक महिने नव्या स्कायवॉकचे बांधकाम सुरू आहे. दोन ठिकाणी सरकते जिनेही लावण्यात आले आहेत. मात्र काही ठिकाणी रंगकाम पूर्ण झालेले नाही. तसेच एका सरकत्या जिन्याचे काम बाकी आहे. ३ ते ४ दिवसांत कामे पूर्ण होतील. त्यानंतर आचारसंहितेत लोकार्पण करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून परवानगी घ्यावी लागेल. परवानगी मिळाल्यास आठवड्याभरात स्कायवॉक सुरू होईल.

# उधारीच्या पैशांवरून महिलेची हत्या

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

घाटकोपर पूर्व भागात कामराजनगर येथे बुधवारी ट्रान्झिस्ट कॅम्प येथे अमिना सिद्दीकी या महिलेची हत्या झाली होती. त्यातील आरोपी मोहम्मद इरफान ऊर्फ चांद याला अखेर पंतनगर पोलिसांनी अटक केली आहे. धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या केल्यानंतर या महिलेचा मृतदेह जवळच्या झाडीत टाकला होता. पैशाच्या व्यवहारातून ही हत्या झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी १५ पथके तयार करून आरोपीचा शोध सुरू केला होता. यातील मृत महिला ही बुधवारी रात्री केटी ९, रायझिंग सीटी, घाटकोपर पूर्व येथे वॉकिंगकरिता गेली होती. मात्र, ती परत घरी न आल्याने तिच्या पतीने पंतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक लता सुतार यांनी परिमंडल ७ चे पोलीस उपायुक्त हेमराजसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला होता. पोलीस पथकांनी या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली, मोबाईल फोनसंदर्भात तांत्रिक तपास केला. तसेच साक्षीदारांकडे कौशल्यपूर्ण चौकशी केली. त्यातून आरोपीचा पूर्व इतिहास पडताळला. त्यात आर्थिक व्यवहारांची पडताळणी केली व इतर आवश्यक तपास केला. त्यातून अखेर आरोपी मोहम्मद इरफान ऊर्फ चांद फकरे आलम अन्सारी (कामराज नगर) याला तेथून ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली. त्याने गुन्हा कबूल केला असून, मृत महिलेने यातील आरोपीच्या पत्नीकडून घेतलेले पैसे परत दिले नाहीत, याचा राग मनात धरून आणि मृत महिलेवर पाळत ठेवून हा खून केल्याचे निष्पन्न झाले.

# माणगाव, तळा व म्हसळा येथील आदिवासी लाभार्थ्यांसाठी घरकुलासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करा - आदिती तटकरे

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

माणगाव, तळा व म्हसळा नगरपंचायत हद्दीतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना आदिवासी घरकुल योजना (शहरी) अंतर्गत घरकुले मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

माणगाव, तळा व म्हसळा नगरपंचायत हद्दीतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीसंदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, माणगाव नगरपंचायतीमधील ४५, तळामधील ६९ आणि म्हसळा मधील 40 (जि. रायगड)



नगरपंचायत क्षेत्रातील घरकुलापासून वंचित असलेल्या अनुसूचित जमातीच्या एकूण 154 घरकुलांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत. या घरकुलासंदर्भातील निधी तसेच पात्र लाभार्थ्यांच्या मान्यतेसाठी करावयाची कार्यवाही कालमर्यादेत करावी.

प्रत्येक लाभार्थ्यास रुपये २.५० लाख प्रमाणे घरकुल अनुदान देण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावांचा विचार करून पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ प्रदान करण्यात यावा. या योजनेमुळे शहरी भागातील आदिवासी कुटुंबांना सुरक्षित निवाऱ्याचा लाभ मिळणार आहे.

बैठकीस आदिवासी विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, अतिरिक्त आयुक्त गोपीचंद कदम, तळा तहसिलदार स्वाती पाटील, माणगाव उपनगराध्यक्षा रिया उभारे, आनंद यादव, लक्ष्मी जाधव, दिलीप जाधव, ॲड. उत्तम जाधव, नाना भुवड, जगदिश शिंदे, नागेश लोखंडे, किशोर शिंदे, परशुराम कदम, अलिम पल्लवकर, लक्ष्मण हिलम, विजय तांबे, शाहीद उके, आदी उपस्थित होते.

# छेडछाडप्रकरणी अतिथी प्राध्यापकाला अटकपूर्व जामीन

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

महाविद्यालयाच्या वार्षिक कार्यक्रमात विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झालेल्या एका गेस्ट प्राध्यापकाला मुंबईतील न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश रुपाली पवार यांनी निर्णय दिला. आझाद मैदान पोलिस ठाण्यात नोंद झालेल्या गुन्ह्यानुसार, आरोपीला २४ नोव्हेंबर रोजी शहरातील एका महाविद्यालयाच्या वार्षिक कार्यक्रमासाठी अतिथी व्याख्याता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान आरोपीने नऊ महिला विद्यार्थी स्वयंसेवकांशी गैरवर्तन केले आणि त्यांना अयोग्य प्रकारे स्पर्श केला. तसेच आरोपीने एका निवृत्त महिला प्राध्यापिकेशीही गैरवर्तन केल्याचा तसेच काही विद्यार्थ्यांच्या संमतीशिवाय त्यांच्यासोबत सेल्फी काढल्याचा आरोप आहे, असे पोलिसांनी सांगितले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला.

# वीज सुरक्षेचे नियम पाळा; विजेचे अपघात टाळा

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

आज वीज मानव जीवनाची मूलभूत गरज असून विजेमुळे लोकांचे दैनंदिन जीवन फार सोयीचे झाले आहे. दैनंदिन जीवनात विजेशिवाय काम करता येत नाही. वीज वापराचे प्रमाण शहरी भाग तसेच ग्रामीण भागातही वाढत चालले आहे. परंतु, वीज यंत्रणा हाताळताना खूप काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक प्रसंगी निष्काळजीपणामुळे गंभीर अपघात घडले आहेत. अशी नुकतीच एक घटना कर्जतमध्ये घडली जिथे एक शेतकरी बेकायदेशीर वीज जोडणी वापरत होता व त्याला विजेचा जोरदार धक्का लागला व त्याने आपले प्राण गमावले. म्हणून ग्राहकांनी अधिकृतपणे वीज जोडणी घेऊन विजेचा वापर करावा असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

विजेबाबत काही विशेष माहिती सगळ्यांना असली पाहिजे. उदा. वीजमीटर पासून घरात जोडणी करण्यात आलेल्या वायरिंगची स्थिती योग्य असल्याबाबतची खात्री अधिकृत परवानाधारक कंत्राट दाराकडून करून घ्यावी. घरातील वीज जोडणी साठी लागणारे साहित्य आयएसआय प्रमाणित असावे. दहा वर्षापेक्षा अधिक जुन्या वायरिंगची तपासणी करून घ्यावी. घरातील सर्व विद्युत उपकरणांची अर्थिंग योग्य असल्याबाबतची खबरदारी घेत राहावी. पाण्याचे नळ किंवा गॅस पाईप यापासून वायरिंग दूर ठेवण्यात यावे. वायरच्या इन्सुलेशन वर ओलसर भागाचा परिणाम होऊन करंट येण्याची शक्यता असते. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्विच तात्काळ बंद करावे. विद्युत उपकरणामधील जोडणी ची माहिती नसताना ते दुरुस्त करू नये किंवा त्यात कोणतेही बदल करू नये. कोणतीही वायरिंग दुरुस्ती करावयाची झाल्यास प्रथम मेन स्विच बंद करावा त्यानंतर काम करावे. विहिरीतून किंवा नदीपात्रातून शेती पंप बाहेर काढणे, स्विच बोर्ड व वायर हाताळणे तसेच तुटलेल्या वीज तार, खाली पडलेले वीज खांब हटवण्याचा प्रयत्न करू नये जेणेकरून वीज अपघात टाळता येतील.

"आजच्या काळात सुद्धा सामान्य जनतेमध्ये विद्युत उपकरणांबद्दल माहिती व जागरूकता कमी असल्याने विद्युत अपघातांच्या घटना घडत असतात. म्हणून, ग्राहकांनी वीज उपकरणांना हाताळताना काळजी घ्यावी. तसेच, अधिकृतपणे विजेचा वापर करावा. अनधिकृतपणे विजेचा वापर करणे धोक्याचे आहेतच शिवाय तो एक गुन्हा देखील आहे. म्हणून स्वतःला अशा अपघातापासून संभवतः दूर ठेवण्यासाठी अनधिकृतपणे विजेचा वापर करू नये. अनधिकृतपणे विजेचा वापर करताना आढळलेल्या कोणत्याही व्यक्तीवर कायदेशीर कारवाई केली जाईल", असे महावितरण भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. संजय पाटील यांनी सांगितले.

# पालिका रुग्णालयांत कॅशलेस उपचार

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांत पुढील वर्षापासून रुग्णांना कॅशलेस उपचार देण्याच्या दृष्टीने 'इंटीग्रेटेड पेशंट्स हेल्थकेअर स्कीम असिस्टन्स सिस्टम' अर्थात 'इफ्सा' योजना लागू करण्याची तयारी सुरू आहे. या माध्यमातून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा एकत्रित लाभ रुग्णांना मिळणार असून, उपचारांसाठी रुग्णांना थेट पैसे खर्च करण्याची गरज भासणार नाही. मात्र, सध्या निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महात्मा फुले जन आरोग्य योजना (एमजेपीजेएवाई) आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (एबीपीएमजेएवाई) यांच्या माध्यमातून महापालिका रुग्णालयांतील रुग्णांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. या योजना दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये आधीच प्रभावीपणे राबवल्या जात असून, महाराष्ट्रात आता त्याचा एकत्रित आराखडा 'इफ्सा' द्वारे अमलात आणण्याचा प्रस्ताव आहे. या योजनेत कर्करोग, हृदयरोग, मूत्रपिंड निकामी होणे, यकृत विकार यांसारख्या गंभीर आजारांच्या उपचारांचा समावेश करण्यात येणार आहे. 'इफ्सा' योजनेत कर्मचारी

राज्य विमा योजना (ईएसआय) तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी यांचाही समावेश करण्यात येणार आहे. सध्या एमजेपीजेएवाय आणि एबीपीएमजेएवायअंतर्गत रुग्णांच्या उपचारांसाठी महापालिकेला दरमहा सुमारे १०० कोटी रुपये मिळतात. मात्र 'इफ्सा' योजना लागू झाल्यानंतर विविध योजनांच्या एकत्रित निधीतून जवळपास १,००० कोटी रुपये उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

सध्या पाच लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च झाल्यास तो रुग्णाला स्वतः भरावा लागतो. मात्र 'इफ्सा' योजनेच्या अंमलबजावणीनंतर उपचारांचा संपूर्ण खर्च कॅशलेस पद्धतीने केला जाणार आहे. पाच लाख रुपत्रांहून अधिक होणारा आरोग्यमंत्री विवेकाधीन निधीतून खर्च राष्ट्रीय आरोग्य निधी आणि भरून काढला जाणार असून, त्यासाठी केंद्र सरकारकडून ५० लाख रुपयांपर्यंत सहाय्य मिळण्याची तरतूद आहे.

# नमुंमपा निवडणूकीत पहिल्यांदाच बहुसदस्यीय पद्धतीने मतदान होत असल्याने विविध स्वरूपात जनजागृती

**नवी मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

१५ जानेवारी रोजी होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक बहुसदस्यीय पद्धतीने होत असून महानगरपालिका क्षेत्रातील २८ प्रभागांपैकी १ ते २७ क्रमांकाचे प्रभाग यामध्ये 'अ', 'ब', 'क', 'ड' असे ४ सदस्य आहेत आणि २८ व्या प्रभागात 'अ', 'ब', 'क' असे ३ सदस्य आहेत.


प्रत्येक मतदाराने प्रभागातील अ, ब, क, ड अशा प्रत्येक जागेकरिता एक मतदान करावयाचे आहे. म्हणजेच २७ प्रभागांमध्ये ४ व २८ व्या प्रभागात ३ सदस्यांना मतदान करावयाचे आहे.

मतदारांना मतदान करताना प्रभागातील अ, ब, क, ड अशा स्वतंत्र जागा कळण्यासाठी मतदान यंत्रावर प्रत्येक जागेकरिता वेगळ्या रंगाची मतपत्रिका असणार असून 'अ' जागेसाठी पांढऱ्या रंगाची, 'ब' जागेसाठी फिक्या गुलाबी रंगाची, 'क' जागेसाठी फिक्या पिवळ्या रंगाची आणि 'ड' जागेसाठी फिक्या निळ्या रंगाची मतपत्रिका असणार आहे.

मतदारांनी अ, ब, क, ड जागेमध्ये नमूद एका उमेदवारास मतदान करावयाचे आहे. त्यानुसार 'अ' मधील उमेदवारासमोरचे बटण दाबल्यानंतर त्यासमोरील लाल दिवा पेटेल, मग 'ब' मधील उमेदवारासमोरील बटण दाबल्यानंतर त्यासमोरील लाल दिवा पेटेल व अशाच प्रकारे 'क' आणि 'ड' जागेमधील उमेदवारासमोरील बटण दाबल्यानंतर त्यासमोरील लाल दिवा पेटेल.

जेव्हा चारही जागांसाठी प्रत्येक जागेसाठी एक अशा प्रकारे मतदान केल्यानंतर मतदान प्रक्रिया पूर्ण होऊन शेवटी 'बीप' असा आवाज येईल. बीप आवाज आला म्हणजे मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. बीप आवाज आल्यानंतरच मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असे समजावे.

यात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक मतदाराला अ, ब, क, ड अशा प्रत्येक जागेसाठी एक असे स्वतंत्र मत द्यायचे आहे. 'अ' किंवा कोणत्याही एकाच जागेसाठी चारही मते देता




येणार नाहीत. 'एक जागा, एक मत' या सूत्रानुसार अ, ब, क, ड अशा जागांसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र मत द्यायचे आहे. जेव्हा कोणताही उमेदवार पसंत नसेल, तर प्रत्येक जागेमध्ये उमेदवारांची यादी संपल्यानंतर शेवटी 'नोटा' (NOTA- None of the above) हा पर्याय उपलब्ध असेल.

तरी प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने यावेळी पहिल्यांदाच बहुसदस्यीय पद्धतीने होणाऱ्या नमुंमपा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये लोकशाहीने आपल्याला दिलेला मतदानाचा हक्क बजावावा आणि १ ते २७ क्रमांकाच्या प्रभागातील नागरिकांनी अ, ब, क, ड या प्रत्येक जागेसाठी प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ४ मते तसेच प्रभाग क्रमांक २८ मधील नागरिकांनी अ, ब, क या ३ जागांमधील प्रत्येक जागेसाठी प्रत्येकी एक या प्रमाणे एकूण ३ मते द्यावीत, असे आवाहन करण्यात येत आहे.

नवी मुंबईकर नागरिक पहिल्यांदाच बहुसदस्यीय पद्धतीने होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीमध्ये मतदान करणार असल्याने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बॅनर्स, पथनाट्ये, रिल्स, चित्रफिती, सोशल मीडिया अशा विविध माध्यमांतून बहुसदस्यीय पद्धतीत मतदान कसे करावे याविषयी जनजागृती करण्यात येत असून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी 'स्वीप' मोहीम अंतर्गत विविध उपक्रमांतून लोकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविला जात आहे.

# मुंबईवर एआय सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

**मुंबई, ३१ प्रतिनिधी**

शहराची सुरक्षा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने मुंबई पोलीस दलाने मोठे पाऊल उचलले आहे. मुंबईत लवकरच आणखी पाच हजार नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असून, हे कॅमेरे अत्याधुनिक एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित असतील. सध्या मुंबईत सुमारे दहा हजार सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत. त्यामध्ये नव्याने पाच हजार कॅमेऱ्यांची भर पडल्यास शहरातील निगराणी व्यवस्था अधिक मजबूत होणार आहे, अशी माहिती एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिली.

नवीन बसवण्यात येणारे सीसीटीव्ही कॅमेरे केवळ चित्रणापुरते मर्यादित नसून ते एआय तंत्रज्ञानावर आधारित असतील. या कॅमेऱ्यांद्वारे संशयास्पद हालचाली, गर्दीचे नमुने, तसेच गुन्हेगारी प्रवृत्ती ओळखणे अधिक सोपे होणार आहे. त्यामुळे गुन्हे घडण्यापूर्वीच त्यावर नियंत्रण ठेवण्यास पोलिसांना मदत मिळणार आहे. एआय प्रणालीमुळे ट्रॅफिक पोलिसांवरील ताण कमी होणार असून मोकळे झालेले मनुष्यबळ गुन्हे प्रतिबंध, गस्त आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी वापरता येणार आहे. विशेषतः गर्दीच्या भागात संवेदनशील ठिकाणी आणि रात्रीच्या वेळी पोलिसांची उपस्थिती अधिक प्रभावीपणे वाढवता येईल. एकूणच सीसीटीव्ही आणि एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने मुंबईची सुरक्षा यंत्रणा अधिक स्मार्ट, वेगवान आणि विश्वासार्ह होणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उचललेले हे पाऊल भविष्यात मुंबईला अधिक सुरक्षित महानगर बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचे ठरणार आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### भांडुप अपघात : दोषी चालकाचा परवाना रद्द होणार

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

भांडुपमध्ये रांगेत उभ्या असलेल्या १४ प्रवाशांना चिरडणाऱ्या बेस्ट बसचा चालक संतोष सावंत याच्या अडचणीत आता अधिक वाढ होणार आहे. अपघाताप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर, आता वडाळा प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) त्याचा वाहनचालक परवाना (लायसन्स) रद्द करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. भांडुपमध्ये बेस्ट अपघातानंतर वडाळा आरटीओतील कर्मचाऱ्यांनी संतोष सावंत याच्या परवान्याचे तपशील बेस्टकडून मागवले आहेत. सर्वप्रथम त्याच्या परवान्याची वैधता तपासण्यात येणार आहे. त्यानंतर नोटीस पाठवण्यात येईल. चालकाला म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. त्यानंतर परवाना रद्द करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक असलेला बॅजही काढून घेण्यात येणार आहे. याआधी, ९ डिसेंबर २०२४रोजी रात्री कुर्ला पश्चिमेस एस. जी. बर्वे मार्गावर बेस्ट बस अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला होता, तर ४० जण जखमी झाले होते. अपघातात दोषी असलेला बसचालक संजय मोरे याचा परवाना रद्द करण्यात आला होता.

### जयगड बंदरातून काजू निर्यातीसाठीची प्रक्रिया गतीने पूर्ण करा - मंत्री नितेश राणे

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड बंदरातून काजू आणि इतर कृषी उत्पादनांच्या निर्यातीची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या. याविषयी मंत्रालयात आयोजित बैठकीवेळी ते बोलत होते. बैठकीस महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, मित्राचे सल्लागार परशराम पाटील यांच्यासह जेएसडब्ल्यू ग्रुपचे प्रतिनिधी उपस्थित होते. निर्यात प्रक्रिया सुरू करण्यासाठी लागणारी सर्व मदत विभाग करेल असे सांगून मंत्री राणे म्हणाले की, कोकणातील उत्पादने लवकरात लवकर आणि सहज निर्यात होण्यासाठी ही प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. बंदराला जोडणी होण्यासाठी कोल्हापूर - वैभववाडी रेल्वे मार्गाचे काम गतीने हाती घेण्यात येत आहे. उत्पादन तपासणी प्रयोगशाळा १५ जानेवारीपर्यंत सुरू करावी. यंदाच्या हंगामात काजू जयगड बंदरातून निर्यात होण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी तयारी करावी. उत्पादकांमध्ये जागृतीसाठी कार्यशाळेचे आयोजन करावे असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

### मोटारसायकल चोराला बेड्या

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

सराईत मोटारसायकल चोराला मालाड पोलिसांनी बेड्या ठोकल्या. प्रथम बोम्मा असे त्याचे नाव असून त्याच्याकडून पोलिसांनी ५ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. प्रथमच्या अटकेने मालाड, विनोबा भावे नगर आणि जोगेश्वरी पोलीस ठाण्यांतील अशा चार गुन्ह्यांची उकल करण्यात मालाड पोलिसांना यश आले आहे. मालाड पश्चिमच्या न्यू लिंक रोड येथून एक मोटारसायकल २० डिसेंबरला चोरी झाली होती. मोटारसायकल चोरीप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला होता. तपासादरम्यान पोलिसांनी त्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. तसेच आणखी कुठून मोटारसायकली चोरी होतात, याची माहिती घेऊन तेथील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तपासादरम्यान महत्त्वाचे फुटेज पोलिसांच्या हाती लागले. मोटारसायकल चोरणारा एकच व्यक्ती असल्याचे उघड झाले. मोटारसायकल चोर हा मालवणी परिसरात जात असल्याचे उघड झाले. चोरट्याला पकडण्यासाठी पोलिसांनी तेथे सापळा रचला. अखेर सापळा रचून पोलिसांनी प्रथमच्या मुसक्या आवळल्या. त्याने गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून जोगेश्वरी, विनोबा भावे नगर परिसर येथून मोटारसायकल चोरीची कबुली दिली.

### नववर्षानिमित्त रक्तदान सोहळा

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

नववर्षाच्या स्वागतासाठी समाजोपयोगी उपक्रम राबवत जीवनदाता सामाजिक संस्था, मुंबई यांच्या वतीने १ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्टेशनवर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जीवनदाता सामाजिक संस्था गेली वीस वर्षे विविध सामाजिक संकल्पनांतून रक्तदान शिबिरे आयोजित करत असून, 'नववर्षाचे स्वागत रक्तदान करून' ही आगळी सामाजिक संकल्पना रक्तदान शिबिरावेळी साकार होणार आहे. नववर्षाच्या पहिल्या दिवशी बहुतेक नागरिक देवदर्शनासाठी मंदिरात जातात. रक्तदान, हेच देवाचे कार्य, कोणासाठी तुमचे रक्त म्हणजे जीवनदान असल्याची भावना या उपक्रमामागे आहे. संस्थेच्या वतीने गेली अनेक वर्षे १ जानेवारी रोजी शासकीय रुग्णालयांमध्ये, विशेषतः थॅलेसेमिया रुग्णांसाठी रक्तदान शिबिरे आयोजित केली जात असून त्याला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. ही सामाजिक संकल्पना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी यावर्षी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्टेशनवर हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबीर १ जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत प्लॅटफॉर्म क्रमांक ७ व ८ मधील जागेत होणार आहे. या शिबिरासाठी कोणत्याही प्रकारची पूर्वनोंदणी आवश्यक नसून, इच्छुक व पात्र रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

### कामिनी शेवाळे यांची माघार

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या तिकिटासाठी सर्वच पक्षांतील इच्छुकांची रस्सीखेच सुरू असताना शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांच्या पत्नीने मात्र कार्यकर्त्यांसाठी एक पाऊल मागे घेतले. कामिनी शेवाळे यांनी मुंबईतील प्रभाग क्रमांक १४२ मधून निवडणूक लढवण्याचा निर्णय मागे घेतला. त्यामुळे या जागेसाठी स्थानिक सामाजिक कार्यकर्त्या अपेक्षा खांडेकर यांनी शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. वास्तविक, मुंबईच्या पूर्व उपनगरातील १४२ क्रमांकाच्या प्रभागातून कामिनी शेवाळे यांनी निवडणूक लढवावी, अशी स्थानिक कार्यकर्त्यांची इच्छा होती. कार्यकर्त्यांच्या या भावनेचा आदर राखत या ठिकाणी अशी चाचपणीदेखील करण्यात आली. मात्र स्थानिक सामाजिक कार्यकर्त्या अपेक्षा खांडेकर यांनी या ठिकाणी उमेदवारी मिळावी, अशी इच्छा व्यक्त केली. कामिनी यांनी अपेक्षा खांडेकर यांना उमेदवारी देण्यासाठी स्वतः पुढाकार घेतला. त्यांच्या या भूमिकेचे पक्षातील वरिष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांसह कौतुक होत आहे.

### समता विद्यामंदिरचा क्रीडा महोत्सव उत्साहात

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

साकीनाका परिसरातील समता शिक्षण संस्थेच्या समता विद्यामंदिर शाळेच्या वतीने या वर्षाचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात पार पडला. संस्थेच्या अध्यक्षा पुष्करणी सुभेदार व सचिव राजेश सुभेदार यांच्या नेतृत्वाखाली क्रीडा महोत्सवाचे केले होते. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन कबड्डीपटू विना खवळे, मुख्याध्यापिका भारती पोवळे यांच्या हस्ते करण्यात आले. या क्रीडा स्पर्धेत कॅरम, बुद्धिबळ, खो-खो, लंगडी, कबड्डी, टेनिस क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, धावण्याच्या शर्यती, रस्सीखेच, गोळा फेक अशा विविध खेळांचा समावेश होता.

# आता रात्री उशिराही खुले राहणार सर्वोच्च न्यायालय

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली,, दि. ३१ : भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी न्यायप्रणाली अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. कायदेशीर आणीबाणीचा सामना करणारे नागरिक, तसेच रात्री उशिरा तपास संस्थांकडून अटक होण्याची शक्यता असलेले लोक आपल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी मध्यरात्रीसुद्धा सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयांचे दार ठोठावू शकतील, असे त्यांनी सांगितले. अशा आपत्कालीन परिस्थितीत कामकाजाच्या वेळेपुरते मर्यादित न राहता, गरज भासल्यास कोणत्याही वेळी न्यायालयात अपील करता येईल, अशी व्यवस्था उभारण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



प्रलंबित घटनात्मक याचिकांचा निपटारा वेगाने करण्यासाठी अधिकाधिक घटनात्मक खंडपीठे स्थापन करणे हे आपले प्राधान्य असल्याचेही सरन्यायाधीशांनी नमूद केले. या याचिकांमध्ये अनेक महत्त्वाचे घटनात्मक प्रश्न उपस्थित झाले असून, त्यात बिहारमध्ये सुरू झालेल्या आणि आता अनेक राज्यांमध्ये राबवण्यात येत असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रियेच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांचाही समावेश आहे. धार्मिक स्वातंत्र्य आणि महिलांच्या हक्कांमधील संघर्षाशी संबंधित प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी नऊ न्यायाधीशांचे खंडपीठ स्थापन करता येईल का, याचाही विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायालयीन कामकाज अधिक शिस्तबद्ध करण्याच्या दृष्टीने वकिलांना युक्तिवादासाठी अमर्याद वेळ देण्याची पद्धत बंद करण्याचा निर्णयही त्यांनी घेतला आहे.

यापुढे युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी कठोर वेळमयार्दा लागू केल्या जातील. अंबानी बंधूंमधील वादासारखा, ज्यामध्ये तब्बल २६ दिवस युक्तिवाद झाले, तसा प्रकार पुन्हा घडू नये, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

गरिब याचिकाकर्त्यांना केवळ मोफत कायदेशीर मदत मिळणे पुरेसे नाही, तर त्यांच्या प्रकरणांना देखील न्यायालयात समान वेळ आणि महत्त्व मिळाले पाहिजे, यावर सरन्यायाधीशांनी भर दिला. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना कलम ३७०, देशद्रोह कायदा आणि पेगासस प्रकरण यांसारख्या अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये निर्णायक भूमिका बजावली आहे. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांनी भारताचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली असून, त्यांचा कार्यकाळ ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहणार आहे.

# खाटूश्याम मंदिर ७२ तास दर्शनासाठी सुरु

■ वृत्तसंस्था, जयपूर, दि. ३१ : राजस्थानमधील खाटूश्याम जी मंदिरात नववर्ष मेळा जोरात सुरू आहे. देश-विदेशातून लाखो भाविक बाबा श्यामाचे दर्शन घेण्यासाठी आले असून, मंदिर समितीने भाविकांसाठी विशेष व्यवस्था केली आहे. मेळ्यादरम्यान मंदिर २४ तास खुले राहील आणि भाविक सलग ७२ तास दर्शन घेऊ शकतील. व्हीआयपी दर्शनाची व्यवस्था सध्या रद्द असून, सर्व भाविक सामान्य पद्धतीने दर्शन घेत आहेत.



सुरक्षा, गर्दी नियंत्रण आणि पार्किंगसाठी प्रशासनाने व्यापक तरतूद केली आहे. रिंगस-खाटू मार्ग वाहनांसाठी बंद राहणार असून, सुरक्षित आणि सुव्यवस्थित दर्शनासाठी स्वतंत्र प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहेत. मंदिरातील सजावट देश-विदेशातून आणलेल्या फुलांनी केली असून, भक्तांचा उत्साह पाहण्यासारखा आहे. श्री श्याम मंदिर समितीचे मंत्री मानवेंद्र सिंह चौहान म्हणाले की, मंगळवारपासून गुरुवारपर्यंत तीन दिवस मंदिर सतत खुलं राहील. या कालावधीत दररोज पाच आरत्या पार पाडल्या जातील, तसेच रात्री दोन तास वगळता मंदिर दर्शनासाठी खुले राहणार आहे. भाविक व्यवस्थित पद्धतीने मंदिरात जाऊन नववर्षाचा आनंद घेऊ शकतील.

सामान्य दिवसांमध्ये मंदिर सोमवार ते शुक्रवार दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत आणि शयन आरतीनंतर रात्री बंद असते. मात्र, मेळ्यादरम्यान अपेक्षित गर्दी आणि भक्तांची श्रद्धा लक्षात घेऊन मंदिर समितीने दिवस आणि रात्र खुले ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अंदाजे ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी दरम्यान ६,००,००० भाविक दर्शनासाठी येतील. गर्दी व्यवस्थापनासाठी रिंगस-खाटू रस्ता पूर्णपणे वाहन-मुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे.

# चालत्या कारमध्ये विवाहितेवर गँगरेप

■ वृत्तसंस्था, फरीदाबाद, दि. ३१ : हरियाणातील फरीदाबादमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दोन तरुणांनी चालत्या गाडीत २५ वर्षीय विवाहित महिलेवर सामूहिक बलात्कार केला. तिने प्रतिकार केला तेव्हा त्यांनी तिला बेदम मारहाण केली आणि नंतर तिला रस्त्याच्या कडेला फेकून दिले, ज्यामुळे ती अडकून पडली. गंभीर अवस्थेत महिलेला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पीडितेच्या बहिणीच्या म्हणण्यानुसार, महिला रात्री १२:०० वाजता घरी जाण्यासाठी गाडीची वाट पाहत होती. दोन तरुणांना घेऊन जाणारी मारुती सुझुकी इको व्हॅन थांबली तेव्हा त्यांनी तिला लिफ्ट देऊ केली. ती चढताच व्हॅन गुरुग्राम-फरीदाबाद रस्त्याच्या दिशेने वेगाने निघाली. असा आरोप आहे की दोघांनी तिच्यावर गाडीत बलात्कार केला आणि सुमारे दोन तास तिला फिरवले. पीडितेच्या बहिणीच्या म्हणण्यानुसार, महिलेने प्रतिकार केला, परंतु त्यांनी तिला मारहाण केली. पहाटे ३:०० वाजताच्या सुमारास त्यांनी तिला चालत्या व्हॅनमधून फेकून दिले. तिच्या चेहऱ्यावर आणि डोक्यावर गंभीर दुखापत झाली, ज्यामुळे डॉक्टरांना तिचा चेहऱ्यावर टाके लावावे लागले.

जखमी महिलेने तिच्या बहिणीला मदतीसाठी बोलावले. ती घटनास्थळी पोहोचली आणि तिला रुग्णालयात घेऊन गेली. सुरुवातीला तिला फरीदाबाद सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, नंतर तिची प्रकृती बिघडल्याने एका खाजगी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. डॉक्टरांनी तिला साक्ष देण्यास अयोग्य घोषित केले. बहिणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(ड) (सामूहिक बलात्कार), ३२३ (हल्ला) आणि ३४ (सामान्य हेतू) अंतर्गत आरोप ठेवण्यात आले आहेत. गुन्हे शाखेने दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले आहे आणि व्हॅन जप्त केली आहे.

# चमोलीमध्ये बोगद्यात दोन लोको ट्रेनची टक्कर, ७० जण जखमी

■ वृत्तसंस्था, चमोली, दि. ३१ : उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात एक मोठा अपघात झाला आहे. पिपलकोटी येथील टिहरी हायड्रो डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या बोगद्यात कामगारांना घेऊन जाणाऱ्या दोन लोको ट्रेन एकमेकांवर आदळल्या. या अपघातात सत्तर कामगार जखमी झाले. मंगळवारी रात्री १० वाजता शिफ्ट बदलताना हा अपघात झाला. दोन्ही ट्रेनमध्ये १०८ कामगार होते.

तांत्रिक बिघाडामुळे मागून एक ट्रेन दुसऱ्या ट्रेनवर आदळल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आत असलेले कामगार स्वतःवर नियंत्रण ठेवू शकले नाहीत आणि अनेक जण आत फेकले गेले. या धडकेमुळे बोगद्यात ओरड आणि घबराट पसरली, कामगारांना बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नव्हता.

अधिकारी सध्या घटनास्थळाची पाहणी करत आहेत आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अपघाताची माहिती मिळताच प्रकल्प व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मदत आणि बचाव कार्य सुरू केले. जखमींना रुग्णवाहिका आणि इतर वाहनांनी गोपेश्वर जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले की, बहुतेक कामगारांना किरकोळ दुखापत झाली आहे, तर काहींना गंभीर दुखापतींमुळे विशेष निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. जखमी झालेल्या ४२ कामगारांवर गोपेश्वर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## २०२५ च्या अखेरीस भारताची मोठी झेप

# जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला भारत

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३१ : भारताच्या विकासप्रवासात २०२५ हे वर्ष निर्णायक ठरले आहे. या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेला बळ मिळाले, रोजगारस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली, महागाईचा दबाव कमी झाला आणि निर्यातीला स्थैर्य लाभले. या सकारात्मक घडामोडींमुळे भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात ८.२ टक्के वाढ नोंदवण्यात आली. ही वाढ प्रामुख्याने मजबूत देशांतर्गत मागणीमुळे शक्य झाली. नोव्हेंबर २०२५ मध्ये बेरोजगारीचा दर घटून ४.७ टक्क्यांवर आला. विशेषतः महिलांच्या बेरोजगारीत झालेली मोठी घट यामागील महत्त्वाची कारणे ठरली. याच काळात व्यापार आणि निर्यात क्षेत्रातही सकारात्मक वातावरण दिसून आले. नोव्हेंबर २०२५ मध्ये भारताची निर्यात ३८ अब्ज डॉलर्सच्या पुढे गेली, जी जानेवारी महिन्यात सुमारे ३६ अब्ज डॉलर्स इतकी होती. २०२५ दरम्यान ब्रिटन, ओमान आणि न्यूझीलंड यांसारख्या देशांशी व्यापार भागीदारी अधिक मजबूत करण्यात आली. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत भारताची



उपस्थिती वाढली असून नव्या आणि उदयोन्मुख बाजारांपर्यंत पोहोच सुलभ झाली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळणारा सातत्यपूर्ण विश्वास, भक्कम देशांतर्गत मागणी, घटती बेरोजगारी आणि नियंत्रणात येत असलेली महागाई यामुळे भारत २०४७ पर्यंतच्या विकास उद्दिष्टांच्या दिशेने स्थिर आणि भक्कम वाटचाल करण्याच्या स्थितीत पोहोचला आहे.

२०२५ मध्ये देशाच्या सुधारणांबद्दलच्या एका सरकारी प्रकाशनात म्हटले आहे - "४.१८ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या सकल देशांतर्गत उत्पादनासह (जीडीपी) भारताने जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली आहे आणि पुढील २.५ ते ३ वर्षांत जर्मनीला तिसऱ्या स्थानावरून मागे टाकून २०३० पर्यंत ७.३ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या अंदाजे जीडीपीसह ते स्थान मिळवण्यास सज्ज आहे."

# जम्मू-काश्मीरमध्ये हाय अलर्ट

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. ३१ : नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षा यंत्रणा कमालीच्या सतर्कतेत ठेवण्यात आल्या आहेत. नियंत्रण रेषेवर वाढत्या हालचाली लक्षात घेता संपूर्ण ७४० किलोमीटर लांबीच्या एलओसीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार सीमेपलीकडील सुमारे ६० लाँचपॅडवरून शंभरहून अधिक दहशतवादी घुसखोरीच्या तयारीत असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ही घुसखोरी नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला होण्याची शक्यता असल्याने भारतीय लष्कर आणि सीमा सुरक्षा दलांनी सुरक्षा व्यवस्था अधिकच कडक केली आहे. डोंगराळ आणि अत्यंत कठीण भूप्रदेशात, सुमारे १३ हजार फूट उंचीवरही अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला असून बीएसएफचे जवान दिवसरात्र पहारा देत आहेत.

# आर्थिक देणग्यांमुळे निकोप लोकशाहीचे व कायद्यांचे अस्तित्व धोक्यात?

सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी २०२४ मध्ये निवडणूक रोखे योजनेला नियम बाह्य ठरवून ती योजना खारीज केली. तरीही भाजपच्या निधी संकलनात लक्षणीय वाढ झालेली आढळून आली आहे. निवडणुक रोख्यांव्दारे देणग्या देण्याची योजना रद्द झाल्यानंतर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात लोकसभेच्या निवडणुका झाल्या. त्याच वर्षात भाजपला ६०८८ कोटी रूपयांच्या देणग्या प्राप्त झाल्या. ही रक्कम २०२३-२४ मध्ये मिळालेल्या ३९६७ कोटी रूपयांच्या देणग्यांपेक्षा सुमारे ५३ टक्क्यांनी जास्त आहेत. भाजपला मिळालेल्या देणग्या बाबतची नोंद पक्षाच्या २०२४-२५ वर्षीच्या देणग्या विषयक अहवालात नमुद करण्यात आली आहे.



मिलिंद गड्डमवार, राजुरा
मो.क्र. ९५११२१५२००

बीजेपीच्या तुलनेत कॉग्रेस पक्षाला ५२२ कोटी रुपए मिळाले आहे.सन २०२३-२४ मध्ये मिळालेल्या ११२९.६६ कोटी रूपयांच्या रकमेपेक्षा अध्यार्हून कमी आहे. ही पक्षाच्या देणगी मध्ये झालेली लक्षणीय घट आहे. कॉग्रेसने निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या योगदान अहवालानुसार ५२२.१३ कोटीपैकी ६० टक्के म्हणजे ३१३.७६ कोटी रुपए इतकी रक्कम निवडणुक रोख्यांमधून प्राप्त झाली आहे.

सन २०२४-२५ मध्ये निवडणूक रोख्यांव्दारे मिळालेल्या देणगीतील निम्म्याहून अधिक रक्कम ही टाटा, ओ पी जिंदाल समुह, एल अँड टी, मेघा इंजिनिअरिंग, अशोक लेलँड, डीएलएफ, महिंद्रा या कंपन्यांनी दिली आहे. या आर्थिक वर्षात राजकीय पक्षांना एकूण ३८११.३७ कोटी रुपए देणगी देण्यात आली . या कंपन्यांनी मिळून २१०७ कोटींची देणगी दिली. केंद्राने निवडणुक रोख्यांपासून मिळालेल्या रक्कमेची माहिती ही आरटीआय-९५ कायद्या अंतर्गत मिळणार नाही याची तरतुद करून ठेवली होती. येथेच शंकेची पाल चुकचुकली होती. जनता यापासून अनभिज्ञ नव्हती. परंतु कायद्याने जनतेचे हात बांधले गेले होते. यांस सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने छेद दिला गेला. तरीही शेपूट वाकडे ते वाकडेच राहिलेले दिसून येते आहे. या प्रकारामुळे लोकशाही ही भांडवलशाहीच्या दावणीला बांधली गेली आहे. असे लक्षात येते आहे. केंद्र सरकार शेतक-यांबाबत कां दुजाभाव करते आहे? याचे उत्तर यात दडलेले आहे. हे यावरून कळून येते आहे. कुठलेही शेतकरी हे निवडणुक बॉण्ड खरेदी करीत नाहीत. कारण त्यांना याची गरज पडत नाही. कृषी व्यवहाराला कुठलाही कर लागत नाही.

शेतक-यांचा व्यवसाय हा नंबर दोनचा नाही. शेतीचे पीक हे आआआण ५२ कशी सोने असते. यात मुळतः कुठलिही भेसळ नसते. यात नंतर भेसळ करून व्यापारी वारेमाप किंमत आकारतात ही बाब वेगळी. त्यांना त्यांच्या वस्तूची विक्री किंमत ठरवता येते. परंतु शेतक-यांना स्वतःच्या मालाची किंमत ठरविता येत नाही. ही विडंबना केंव्हा दूर होणार आहे? व्यावसायिक, उद्योगपती यांचे पक्षीय निधीत बरेच योगदान असते. कुठलेही धंदेवाईक, उद्योगपती हे बोर देऊन आवळा काढण्यात पटाईत असतात. ते सरकारकडून सरकारी जमीन हडपतात. यावर आपले उद्योग उभारतात. मोठ मोठे कर्ज घेतात आणि स्वतः जवळील पैसा खर्च न करता सरकारी अनुदानातून आपला उद्योग उभारतात. जेणेकरून उद्याला उद्योग डबघाईला गेला तरी आपल्याला याची झळ पोहचणार नाही याची काळजी घेतात. पक्षीय देणग्यांमुळे राज्यकर्ते त्यांच्या धोरणाविरोधात सहसा जात नाहीत. याचा फटका सामान्य जनतेला बसतो आहे. गडचिरोली सारख्या भागात पेसा कायदा गुंडाळून ठेवून कामे होत आहेत. उद्योजक आपले उद्योग उभारतांना पर्यावरणाविरोधात भुमिका घेतात. तरीही केंद्र व राज्य सरकार त्यांना वाटेल ती मदत करण्यास तयार असतात. याच कारणाने लोकशाहीतील कायदे हे पायदळी तुडवले जात आहेत. पक्षीय फंडाचा वापर करून जनतेची मते ही निवडणुकीत खरेदी केली जात आहेत.

पैशातून सत्ता अन सत्तेतून पैसा या विचाराचा पगडा यामुळेच प्रगल्भ झाला आहे. ही लोकशाही प्रक्रियेला लागलेली कीड आहे. यामुळे लोकशाही प्रक्रीया धोक्यात आली आहे. निवडणुकीचा खर्च लाखांमध्ये, करोडोंमध्ये केला जातो आहे. मग सामान्य व गरीब जनता हा पैसा कुठून आणणार? यासाठी तीला कुठल्यातरी पक्षाचाच आधार हा घ्यावा लागतो आहे. मग त्या पक्षाची धोरणे पटो वा न पटोत. याचा विचार कोण करणार आहेत? यामध्ये बदल घडवून आणण्याचे आव्हान आजच्या तरूणाईने स्विकारले पाहिजे. तरच भारतीय लोकशाही जीवंत असणार आहे. अन्यथा ती भांडवलदारांच्या हातचे बाहुले बनणार आहे. हे विसरून कसे चालेल.

# भीमा कोरेगाव शौर्य दिन

## सामाजिक समतेच्या संघर्षाची प्रेरणागाथा

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना केवळ लष्करी विजय किंवा पराभव म्हणून मर्यादित राहत नाहीत, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या, आत्मसन्मानाच्या आणि समानतेच्या संघर्षाचे प्रतीक बनतात. १ जानेवारी रोजी साजरा होणारा भीमा कोरेगाव शौर्यदिन ही अशीच एक ऐतिहासिक घटना आहे. १८१८ साली भीमा नदीच्या काठावर घडलेली भीमा कोरेगावची लढाई ही केवळ इंग्रज आणि पेशवाई यांच्यातील संघर्ष नव्हता, तर तो तत्कालीन सामाजिक विषमतेविरुद्ध उभा राहिलेल्या शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या आत्मसन्मानाचा लढा होता. म्हणूनच हा दिवस केवळ इतिहासातील एक पान नसून, आजही सामाजिक समतेच्या संघर्षाला दिशा देणारा प्रेरणास्तंभ आहे.






डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पेशवाईच्या काळात भारतीय समाजावर कडव्या जातिव्यवस्थेचे जाचक ओझे होते. विशेषतः महार, मांग, चांभार यांसारख्या दलित समाजघटकांवर अमानवी निर्बंध लादले गेले होते. सार्वजनिक विहिरी, मंदिरे, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानवी हक्क यांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले होते. अशा स्थितीत पेशवाईविरोधात उभे ठाकलेले महार समाजातील सैनिक इंग्रज सैन्यात सहभागी झाले आणि त्यांनी भीमा कोरेगावच्या रणांगणावर पराक्रम गाजवला. संख्येने कमी असूनही त्यांनी पेशव्यांच्या बलाढ्य सैन्याला रोखले. या विजयाने दलित समाजाला केवळ लष्करी यश मिळाले नाही, तर त्यांनी सामाजिक अपमानाच्या इतिहासाला छेद दिला.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भीमा कोरेगावची लढाई ही सत्ता, जात आणि प्रतिष्ठा यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. तत्कालीन सामाजिक रचना ही सत्ताधारी उच्चवर्णीयांच्या बाजूने झुकलेली होती. पेशवाई ही केवळ राजकीय सत्ता नव्हती, तर ती धार्मिक-सामाजिक वर्चस्वाचीही प्रतिनिधी होती. अशा व्यवस्थेविरुद्ध उभा राहणे म्हणजे केवळ युद्ध जिंकणे नव्हे, तर सामाजिक मानसिकतेला आव्हान देणे होते. महार सैनिकांनी हे आव्हान स्वीकारले आणि इतिहासात आपले नाव कोरले.

या घटनेचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला मानवंदना दिली. त्या दिवसापासून भीमा कोरेगाव शौर्यदिनाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. डॉ. आंबेडकरांसाठी हा विजय ब्रिटिशांच्या बाजूने मिळालेला लष्करी यश नव्हता, तर तो अस्पृश्यतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या आत्मसन्मानाचा विजय होता. त्यांनी या घटनेचा उपयोग दलित समाजात स्वाभिमान, संघटन आणि संघषार्ची चेतना निर्माण करण्यासाठी केला.

भीमा कोरेगाव शौर्यदिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व समजून घेताना स्मृती-राजकारण या संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणता इतिहास सांगितला जातो, कोणता दडपला जातो आणि कोणाच्या स्मृती जपल्या जातात, यावर समाजाची दिशा ठरते. पारंपरिक इतिहास लेखनात दलित, स्त्रिया आणि वंचित समाजघटकांचे योगदान दुर्लक्षित राहिले. भीमा कोरेगावची आठवण ही या दुर्लक्षित इतिहासाला केंद्रस्थानी आणणारी आहे. म्हणूनच हा दिवस केवळ भूतकाळाची आठवण नाही, तर इतिहास पुन्हा मांडण्याचा सामाजिक प्रयत्न आहे.

आज भीमा कोरेगाव शौर्यदिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. देशभरातून लाखो लोक या ठिकाणी एकत्र येतात. ही केवळ श्रद्धांजली नसून, ती एक सामाजिक जाणीव आहे. या एकत्र येण्यामागे समानतेची आकांक्षा, संविधानिक मूल्यांची निष्ठा आणि अन्यायाविरुद्धचा आवाज दडलेला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा मेळावा सामूहिक ओळख निर्माण करतो. जात, वर्ग, प्रदेश यापलीकडे जाऊन लोक एकमेकांशी जोडले जातात.

मात्र, भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या संदर्भात उद्भवणारे वाद आणि संघर्षही समाजशास्त्रीय विश्लेषणाची मागणी करतात. काही घटकांना हा दिवस अस्वस्थ करतो, कारण तो पारंपरिक सत्तासंरचनांना प्रश्न विचारतो. इतिहासाचे वेगवेगळे अर्थ लावले जातात आणि स्मृतींवर अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष होतो. या पार्श्वभूमीवर, समाजात संवाद, समज आणि सहअस्तित्वाची गरज अधोरेखित होते. भीमा कोरेगावची प्रेरणा संघर्षाची असली, तरी तो संघर्ष मानवी मूल्यांसाठी आहे, द्वेषासाठी नव्हे.

आजच्या काळात, जेव्हा संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि लोकशाहीवर विविध प्रकारचे आव्हाने येत आहेत, तेव्हा भीमा कोरेगाव शौर्यदिन अधिकच महत्त्वाचा ठरतो. हा दिवस आपल्याला सांगतो की अधिकार सहज मिळत नाहीत; त्यासाठी संघटित संघर्ष करावा लागतो. दलित समाजाचा हा इतिहास केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण भारतीय लोकशाहीच्या प्रवासाचा भाग आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत आजही असमानता दिसून येते. भीमा कोरेगावची आठवण ही या असमानतेविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देते. समाजशास्त्रीय दृष्टीने, हा दिवस सामाजिक गतिशीलतेचा संदेश देतो. इतिहासात दडपल्या गेलेल्या समाजघटकांनी शिक्षण, चळवळ आणि संविधानाच्या माध्यमातून आपले स्थान बदलू शकते, हे भीमा कोरेगावचे प्रतीक आहे.

म्हणूनच, भीमा कोरेगाव शौर्यदिन साजरा करताना केवळ भूतकाळाचा गौरव न करता वर्तमान आणि भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. जातीय द्वेष, सामाजिक बहिष्कार आणि असमानता यांना नकार देत, समतेवर आधारित समाज उभारण्याचा संकल्प करण्याची ही वेळ आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक मूल्यांच्या चौकटीत राहून, लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची प्रेरणा भीमा कोरेगाव आपल्याला देते. अखेरीस असे म्हणता येईल की, भीमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ एका लढाईचा स्मृतिदिन नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या दीर्घ संघर्षाचा प्रतीकात्मक उत्सव आहे. हा दिवस आपल्याला इतिहासातून शिकवतो की, अन्याय कितीही खोल रुजलेला असला, तरी संघटित इच्छाशक्ती, आत्मसन्मान आणि समानतेची जाणीव त्याला आव्हान देऊ शकते. म्हणूनच १ जानेवारी हा दिवस शौयार्चा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या अखंड प्रवासाचा साक्षीदार ठरतो.

# जर्मनीच्या बँकेतून २९० कोटींची चोरी

■ वृत्तसंस्था, बर्लिन, दि. ३१ : जर्मनीतील गेल्सेंकिर्चेन शहरात असलेल्या स्पार्कस बँकेत २९० कोटी रुपयांची चोरी झाली. चोरांनी बँकेच्या पार्किंग गॅरेजच्या भिंतीला मोठे भगदाड पाडले आणि थेट तिजोरीपर्यंत पोहोचले. त्यानंतर त्यांनी ३,२५० हून अधिक सेफ डिपॉझिट लॉकर तोडले आणि त्यातील रोकड व मौल्यवान दागिने घेऊन पळ काढला. पोलिसांनुसार, चोरांनी ही चोरी ख्रिसमसच्या सुट्ट्यांमध्ये केली, जेव्हा बहुतेक दुकाने आणि कार्यालये बंद होती. असे मानले जात आहे की, गुन्हेगारांनी हा काळ जाणूनबुजून निवडला जेणेकरून कोणालाही संशय येऊ नये आणि परिसरात लोकांची वर्दळही कमी असावी.

# भीमा कोरेगावची शौर्यगाथा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

१ जानेवारी १८१८ रोजी पुण्याजवळील भीमा कोरेगाव येथे घडलेली लढाई ही केवळ दोन सैन्यांमधील संघर्ष नव्हता, तर ती सामाजिक अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या शोषितांच्या आत्मसन्मानाची ऐतिहासिक साक्ष आहे. पेशवाईच्या अन्यायी, जातीय वर्चस्वशाही व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्या महार सैनिकांनी दाखवलेले शौर्य आजही सामाजिक समतेच्या लढ्याचे प्रेरणास्थान आहे.



या युद्धात ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यातील महार समाजातील सैनिकांनी पेशव्यांच्या प्रचंड सैन्याचा पराभव केला. संख्येने कमी असूनही त्यांनी दाखवलेले धैर्य, शिस्त आणि आत्मविश्वास हा इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. पेशवाईच्या काळात ज्यांना अस्पृश्यतेचे, अन्यायाचे आणि अपमानाचे जीवन जगावे लागले, त्याच समाजाने रणांगणावर विजय मिळवून अन्यायाच्या व्यवस्थेला आव्हान दिले.हीच शौर्यगाथा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नव्या अथार्ने समाजासमोर मांडली.



प्रमोद जांभूळकर
९८२३९६९०९७

बाबासाहेबांनी भीमा कोरेगावचा इतिहास केवळ गौरवासाठी नव्हे, तर स्वाभिमान, समानता आणि हक्कांच्या संघर्षाचे प्रतीक म्हणून मांडला. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी विजयस्तंभाला भेट देऊन या लढाईला सामाजिक क्रांतीचे अधिष्ठान दिले. डॉ. आंबेडकरांचे विचार स्पष्ट होते, इतिहास हा केवळ राजे-महाराजांचा नसतो, तर तो शोषित-वंचितांच्या संघर्षाचाही असतो. भीमा कोरेगावची गाथा ही बाबासाहेबांच्या विचारांशी पूर्णतः सुसंगत आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये त्यांच्या विचारांचा गाभा होता. सामाजिक गुलामगिरी, जातीय अन्याय आणि मानवी प्रतिष्ठेचा अपमान याविरुद्ध लढण्यासाठी बाबासाहेबांनी संविधानाचा मार्ग दिला. भीमा कोरेगावचा विजय हा त्या संघर्षाचा ऐतिहासिक आरंभ मानला जातो.

आज भीमा कोरेगाव हे केवळ एक युद्धस्थळ राहिलेले नाही, तर ते दलित अस्मितेचे, आत्मसन्मानाचे आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक बनले आहे. दरवर्षी लाखो अनुयायी येथे येऊन शहीदांना अभिवादन करतात. मात्र, या ऐतिहासिक स्मृतीभोवती वाद, हिंसा आणि राजकीय गैरवापर होण्याचे प्रकार घडत आहेत. हे प्रकार भीमा कोरेगावच्या मूळ आशयाला छेद देणारे आहेत.

आजच्या काळात गरज आहे ती बाबासाहेबांच्या विचारांकडे गांभीर्याने पाहण्याची. भीमा कोरेगावचा संदेश द्वेषाचा नसून समतेचा, न्यायाचा आणि संविधानिक मूल्यांचा आहे. इतिहासातून प्रेरणा घेऊन समाजात एकोपा, बंधुता आणि सामाजिक सलोखा निर्माण करणे हीच खरी आदरांजली ठरेल. भीमा कोरेगावची शौर्यगाथा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे एकमेकांना पूरक आहेत. शौर्याला विचारांची दिशा मिळाली आणि विचारांना इतिहासाचे बळ मिळाले. या दोन्हींचा संगम म्हणजेच समताधिष्ठित, न्यायपूर्ण आणि लोकशाही भारताच्या उभारणीचा मार्ग आहे.



# वर्षाअंती शेअर बाजार वाढीसह बंद
## सेन्सेक्समध्ये ५४६ अंकांची झेप

**सेन्सेक्स 85,220**
**निफ्टी 26,129**

**मुंबई, दि. ३१ प्रतिनिधी**

२०२५ च्या अखेरच्या दिवशी शेअर बाजार वाढीसह बंद झाला. दोन्ही प्रमुख बेंचमार्क निर्देशांक हिरव्या चिन्हात बंद झाले. याशिवाय, बुधवारी मेटल क्षेत्रातही जोरदार तेजी पाहायला मिळाली. सरकारने पुढील तीन वर्षांसाठी काही प्रकारच्या आयातीत स्टीलवर सेफगार्ड ड्युटी लावण्याचा निर्णय घेतल्यामुळे ही वाढ झाली. तसेच तेल आणि वायू (ऑइल अँड गॅस) क्षेत्रातही तेजी दिसून आली.

बुधवारी सेन्सेक्सने ८४,७९३ पातळीवर व्यवहाराची सुरुवात केली आणि दिवसअखेर ०.६४ टक्क्यांच्या वाढीसह ८५,२२० पातळीवर बंद झाला. तर निफ्टी ५० ने २५,९७१ पातळीवर ओपनिंग घेतली आणि दिवसअखेर ०.७४ टक्क्यांच्या वाढीसह २६,१२९ पातळीवर बंद झाला. बेंचमार्क निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांची कामगिरी अत्यंत उत्कृष्ट राहिली. बीएसई मिडकॅप निर्देशांकात १ टक्क्यांची वाढ झाली, तर बीएसई स्मॉलकॅप निर्देशांकात १.१८ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक वाढ जेएसडब्ल्यू स्टीलमध्ये दिसून आली, ज्याच्या शेअरमध्ये ४.७९ टक्क्यांची तेजी होती. त्यानंतर टाटा स्टीलमध्ये २.४४ टक्के, ओएनजीसीमध्ये २.४३ टक्के, कोटक बँकेत २.२५ टक्के आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडमध्ये १.९९ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक नुकसान टीसीएसला झाले असून त्याच्या शेअरमध्ये १.२६ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर टेक महिंद्रामध्ये ०.८६ टक्के, ग्रासिम इंडस्ट्रीजमध्ये ०.४५ टक्के, इन्फोसिसमध्ये ०.३९ टक्के आणि बजाज फायनान्समध्ये ०.२६ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.

# नागपूरच्या वैद्यकीय क्षेत्रावर जणू वीज कोसळली
## प्रभावशाली न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे अकस्मात निधन

**नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी**

राजकारणात जशी एखादी अनपेक्षित घटना संपूर्ण समीकरणे बदलते, तसाच जबरदस्त धक्का नागपूरच्या वैद्यकीय विश्वाला आज बसला आहे. बुधवारी, ३१ डिसेंबरच्या पहाटे, शहरातील नामवंत न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात निधन झाले आणि नागपूरच्या आरोग्य व्यवस्थेतच नव्हे, तर समाजमनातही पोकळी निर्माण झाली.

धंतोली येथील न्यूरॉन हॉस्पिटलशी दीर्घकाळ जोडलेले डॉ. पाखमोडे हे केवळ डॉक्टर नव्हते, तर मध्य भारतातील न्यूरोसर्जरीचे एक 'निर्णायक चेहरा' म्हणून ओळखले जात होते. अवघ्या ५० व्या वर्षी, पहाटे अचानक मायोकार्डियल इन्फार्क्शनचा झटका आला आणि क्षणातच सगळं बदलून गेलं.

पहाटे साडेचारपासून सकाळी सहा वाजेपर्यंत शहरातील वरिष्ठ कार्डिओलॉजिस्ट आणि डॉक्टरांची 'आपत्कालीन फळी' जणू रणांगणात उतरली होती. सलग सीपीआर, तातडीचे सर्व उपचार, प्रत्येक शक्यता आजमावली गेली... पण नियतीसमोर सारे प्रयत्न निष्प्रभ ठरले. अखेर डॉक्टरांनीच डॉक्टर गमावल्याची



वेदनादायक घोषणा झाली.

डॉ. पाखमोडे यांचे जाणे म्हणजे केवळ एक व्यक्ती हरपणे नव्हे, तर नागपूरच्या वैद्यकीय धोरणात्मक ताकदीला बसलेला मोठा धक्का आहे, अशी भावना अनेक सहकाऱ्यांतून व्यक्त होत आहे. ज्या पद्धतीने राजकारणात अनुभवी नेता अचानक निघून गेल्यावर सत्ता-संतुलन ढवळून निघते, तशीच अस्वस्थता आज आरोग्य क्षेत्रात दिसून आली.

कठीण न्यूरोसर्जरी, रुग्णांशी असलेली आपुलकी, आणि उपचारात दाखवलेली ठाम भूमिका—यामुळे ते रुग्णांसाठी 'शेवटचा विश्वास' ठरले होते. त्यांच्या अनेक शस्त्रक्रियांनी असंख्य कुटुंबांना नवी आशा दिली. आज मात्र तेच रुग्ण, डॉक्टर आणि शुभेच्छुक, हळहळ व्यक्त करताना दिसत आहेत.

शहरातील वैद्यकीय वर्तुळात चर्चा आहे की, डॉ. पाखमोडे यांचे अकस्मात जाणे हे नागपूरच्या आरोग्य व्यवस्थेसाठी 'रिक्त पद' नाही, तर 'रिक्त नेतृत्व' आहे. पुढील काळात ही उणीव भरून काढणे किती कठीण असेल, याची जाणीव आता प्रकर्षाने होत आहे.

एक गोष्ट मात्र निश्चितडॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे कौशल्य, त्यांची निर्भीड निर्णयक्षमता आणि रुग्णसेवेतील निष्ठा, ही केवळ वैद्यकीय इतिहासात नाही, तर नागपूरच्या सामूहिक स्मरणात दीर्घकाळ जिवंत राहणार आहे.

# उंदरांनी खाल्ला २०० किलो गांजा; पोलिसांचा दावा

**रांची, दि. ३१ वृत्तसंस्था**

## आरोपीची निर्दोष मुक्तता

झारखंडमध्ये एक आश्चर्यकारक प्रकार समोर आला आहे. झारखंड पोलिसांनी तीन वर्षांपूर्वी एक मोठी कारवाई केली होती. पोलिसांनी एका वाहनाची तपासणी केली असता त्या वाहनात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ आढळले होते. त्यामुळे पोलिसांनी आरोपींसह वाहन आणि संबंधित अंमली पदार्थ जप्त करत कारवाई केली होती.

त्यानंतर आता २०२४ मध्ये जेव्हा या प्रकरणी खटल्याच्या सुनावणीवेळी हे पदार्थ (पुरावा) न्यायालयात सादर करण्याची वेळ आली तेव्हा पोलिसांनी केलेला दावा ऐकून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. पोलिसांनी न्यायालयात दावा केला की, कारवाई केल्यानंतर जप्त करण्यात आलेला अंमली पदार्थ (गांजा) गोदामात साठवून ठेवण्यात आला होता. मात्र, तो गांजा आता उंदरांनी खाल्ला आहे.

पोलिसांनी केलेला दावा ऐकल्यानंतर या प्रकरणातील आरोपीला रांची येथील विशेष एनडीपीएस न्यायालयाने निर्दोष मुक्त केलं आहे. कारण या प्रकरणात न्यायालयाने तपासात अनेक त्रुटी अधोरेखित केल्या. तसेच पोलिसांना न्यायालयासमोर पुरावा सादर करता आला नाही. त्यामुळे न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

दरम्यान, फिर्यादी पक्षाच्या म्हणण्यानुसार, रांची जिल्ह्यातील ओरमांझी पोलिसांनी १७ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय महामार्ग-२० वर एका पांढऱ्या रंगाची बोलेरो



गाडीवर कारवाई करण्यात आली असता अंमली पदार्थांची तस्करी करण्यात येत असल्याचं आढळून आले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ती गाडी थांबवल्यानंतर त्या गाडीमधून तिघे जण उडी मारून पळून जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यातील इंद्रजित याला अटक करण्यात आली होती, तर आणखी दोन जण पळून जाण्यात यशस्वी झाले होते. तेव्हा पोलिसांनी गाडीची झडती घेतली आणि डब्यांमध्ये लपवून ठेवलेला सुमारे १७० पॅकेटमध्ये पॅक केलेला २०० किलो गांजा सापडल्याचा दावा पोलिसांनी केला होता.

# सौदी अरेबियाचा हवाई हल्ला
## यूएईची सैन्य माघारीची घोषणा

**रियाद, दि. ३१ वृत्तसंस्था**

सौदी अरेबिया व संयुक्त अरब अमिराती (यूएई) या तेल पुरवठा करणाऱ्या महत्वाच्या दोन अरब राष्ट्रांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. सौदी अरेबियाने येमेनमधील मुकल्ला बंदरावर हवाई हल्ला केला आहे. येमेनमध्ये सध्या यूएईच्या सैन्याची मोठ्या प्रमाणात उपस्थिती आहे. येमेनमधील बंडखोरांना शस्त्र व दारूगोळा पुरवण्यासाठी यूएईने एक जहाज मुकल्ला बंदरावर पाठवले, असा संशय सौदी अरेबियाला होता. त्यामुळे सौदी अरेबियाने यूएईने पाठवलेल्या जहाजाला लक्ष्य करण्यासाठी मुकल्ला बंदरावर 'एअरस्ट्राईक' केले आहे. त्यानंतर यूएईने आपले सैन्य येमेनमधून माघारी बोलावणार असल्याचे घोषित केले आहे. तेल पुरवठा करणाऱ्या दोन मुस्लिम राष्ट्रांमध्ये यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली आहे.

सौदी अरेबियाने मंगळवारी यूएईला येमेनमधील सैन्य मागे घेण्यास चोवीस तासांची मुदत दिली होती. त्यानंतर काही तासांतच सौदी अरेबियाकडून मुकल्ला बंदरावर हवाई हल्ला करण्यात आला आहे. सौदी अरेबियाच्या हल्ल्यानंतर येमेनमधून सैन्य माघारी घेणार असल्याची घोषणा यूएईने केली आहे. यूएईने शस्त्र व दारूगोळा येमेनमधील फुटीरतावादी संघटनांच्या मदतीसाठी पाठवल्याने सौदी अरेबियाची सुरक्षितता धोक्यात आली होती, सौदीच्या अरेबियाच्या संरक्षणासाठी 'एअरस्ट्राइक' केल्याचे सौदी अरेबियाने म्हटले आहे. दरम्यान, यूएईने सौदी



अरेबियाने केलेला दावा फेटाळला आहे. जहाजातील शस्त्रे ही यूएईच्या सैनिकांसाठी पाठवली होती, असे यूएईने म्हटले आहे.

सौदी अरेबियाने केलेल्या हवाई हल्ल्याचे आश्चर्य वाटते, असे यूएईच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. दोन्ही देशांमध्ये तणाव वाढल्यानंतर अमेरिकेचे स्टेट सेक्रेटरी मार्को रुबियो यांनी सौदी अरेबिया व यूएईच्या परराष्ट्र मंत्र्यांशी फोनवर चर्चा केली. कुवेत, बहरीन, कतार या देशांनी सौदी अरेबिया व यूएईमधील तणावावर चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, हवाई हल्ल्यानंतर येमेनमध्ये दहशतवाद्यांच्या विरोधात सुरू असलेली मोहीम संपवत असल्याचे यूएईने घोषित केले आहे. "आमची दहशतवाद्यांविरोधात सुरू असलेली मोहीम आता शेवटच्या टप्प्यात आहे", असे यूएईने म्हटले आहे.

येमेनमधील फुटीरतावादी संघटना साऊदर्न ट्रान्सिशनल कौन्सिलला (STC) यूएई मदत करत आहे, तसेच STC च्या बंडखोरांना सौदी अरेबियाच्या सीमांवर पाठवत आहे. यामुळे सौदी अरेबियाच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचे सौदी अरेबियाकडून सांगण्यात आले होते. सौदी अरेबिया व यूएई या दोन देशांनी मिळून येमेनमधील हुतींच्या विरोधात लढा दिला होता. त्यानंतर सौदी अरेबियाने येमेनमधील सरकारला पाठिंबा दिला, तर यूएईने येमेनच्या दक्षिण भागात असलेल्या फुटीरतावादी संघटना STC ला पाठिंबा दिला. सौदी अरेबियाचा पाठिंबा असलेल्या येमेन सरकारमधील रशद-अल-अलिमी म्हणाले, "यूएई येमेनमधील बंडखोरांना पाठिंबा देत असून त्यांना येमेनमध्ये बंड करण्यासाठी उत्तेजित करत आहे, हे स्पष्ट होते."

# रशिया भारताला देणार घातक एअर डिफेन्स सिस्टम

**नवी दिल्ली, दि. ३१ वृत्तसंस्था**

रशियाने भारताला त्यांची मध्यम पल्ल्याची एअर डिफेन्स सिस्टम एस-३५० ऑफर केली आहे. विशेष म्हणजे रशियाने ही ऑफर टेक्नॉलॉजी ट्रान्सफरसह दिली आहे. म्हणजे भारत या एअर डिफेन्स सिस्टमचे काही भाग हे स्वतः बनवू शकतो. मिळालेल्या माहितीनूसार ही सिस्टम



भारताच्या सध्याच्या एस ४०० ट्रायम्फ बॅटऱ्यांना देखील सपोर्ट करू शकणार आहे. यामुळे भारताची एकात्मिक एअर डिफेन्स सिस्टम नेटवर्क अजून स्ट्राँग होणार आहे.

नुकत्याच झालेल्या उच्च स्तरावरील चर्चेत एस-३५० व्यतिरिक्त एस-४०० रेजिमेंट्स आणि एस-५०० सिस्टमवर देखील चर्चा झाली आहे. मात्र रशिया सध्या एस-३५० सिस्टम त्वरित उपलब्ध आणि व्यवहारिक पर्यायाच्या स्वरूपात पुढं केलं आहे. भारतात आधीपासूनच एस-४०० या एअर डिफेन्स सिस्टमच्या तीन स्वाड्रन ऑपरेशनल झाल्या आहेत. अजून दोन सिस्टम येणाऱ्या काळात भारताच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. एस-३५० ही मध्यम आणि इनर लेअर डिफेन्ससाठी आदर्श मानली जात आहे.

S-350 Vityaz ही (एक्सपोर्ट व्हर्जन एस - ३५० ई) रशियाचे अत्याधुनिक मध्यम रेंजचे सर्फेस टू एअर मिसाईल स्टिस्टम आहे. ही सिस्टम अल्माज - एंटे यांच्याद्वारे तयार केली आहे. ही जुन्या एस - ३०० पीएस सिस्टमला रिप्लेस करण्यासाठी डिझाईन करण्यात आली आहे.

**रेंज :** एरोडायनॅमिक टार्गेट्ससाठी विशेष करून फायटर जेट्ससाठी याची रेंज १२० किलोमीटरपर्यंत आहे. तर बॅलेस्टिक मिसाईलसाठी याची रेंज २५ ते ३० किलोमीटर आहे.

**उंची :** ही एअर डिफेन्स सिस्टम २० ते ३० किलोमीटर अंतरावरची टार्गेट्स इंटरसेप्ट करू शकतात.

मिसाईलः यात प्रामुख्याने ॲक्टिव्ह रडार गायडेड 9M96E आणि 9M96E2 मिसाईल, त्याच्या जोडीला शॉर्ट रेंजचे 9M100 च्या मिसाईलचा समावेश आहे. एका लॉंचरमध्ये १२ मिसाईल लोड करता येतात.

**टार्गेट क्षमता :** एकावेळी ही एअर डिफेन्स सिस्टम विमान अन् हेलिकॉप्टर सारखी १६ टार्गेट्स तर १२ बॅलेस्टिक मिसाईल टार्गेट्स ट्रॅक करून त्यावर अटॅक करू शकते.

# पशुपक्ष्यांच्या भावना समजणारी भूमी जीवदया संवर्धन संस्था

**लोकजागर**

आजकाल 'मेवा तिथे सेवा' हे ब्रीद घेऊन समाजसेवकाचा मुखवटा लावलेल्या कितीतरी संस्था आणि व्यक्ती पैशाला पासरी आहेत. उद्देश एकतर लोकसहभागातून कोणती ना कोणती विचारधारा लोकांच्या मनावर लादण्यासाठी तसेच या माध्यमातून सर्व प्रकारचे दान उकळणे असाच काहीसा असतो, पण मग भूमी जीवदया संवर्धन संस्थेच्या या पशुपक्षी प्रेमाचा, सेवेचा उद्देश काय? यावर भूमी जीवदया संवर्धन संस्थेचे ट्रस्टी सागर सालवा म्हणाले की, "माणसाचं काय हो? विनोद झाला तर त्यांना हसता येतं, दुखलं तर रडून सांगता येतं पण, प्राण्यांनी आणि पक्ष्यांनी काय करावं? कोणाशी बोलावं? तुम्ही ऐकलंय त्यांचं बोलणं ! नाही ना ! पण प्राणी बोलतात...पण त्यांचं निःशब्द बोलणं ऐकण्यासाठी मनाची भाषा कळावी लागते आणि त्याहून आधी त्यांना समजून घ्यावं लागतं. स्वार्थाच्या पलीकडे जाऊन एक करुणेची, दयेची संवेदना आहे. त्या संवेदनेचा उद्देश घेऊन भूमी जीवदया संवर्धन संस्था काम करते. तसं पाहिलं तर सागर यांना



राघवजीभाई पटेल, संस्थेचे संस्थापक

**लोकसेवार्थ**

प्राण्यांची अगदी लहानपणापासून आवड आणि राहायला ते मुलुंडला. मग त्या वेळी म्हणजे दहा वर्षांपूर्वी रेस्क्यू माध्यमातून त्यांनी त्यांच्या या कार्याची सुरुवात मुलुंडमधील 'बेन्नास' या संस्थेसोबत सुरू केली. त्यानंतर गोवंडीमधील 'आय. डी.ए.' या संस्थेमध्ये त्यांनी दोन वर्ष सेवा केली आणि या वेळात प्राण्यांविषयीचं दाट प्रेम अगदी त्यांच्या रक्तात भिनायला सुरुवात झाली आणि त्यांचं हे प्रेम अमर करायची संधी त्यांचे गुरू राघवजी पटेल यांनी २०१४ साली मिळवून दिली २७ जुलै, २०१४ या दिवशी भूमी जीवदया संवर्धन संस्थेची निर्मिती झाली. हे स्वप्न म्हणजे राघवजी आणि सागर या दोघांची इच्छापूर्ती.

ते म्हणाले, "संस्थेचा मूळ उद्देश प्राणीमात्रांचे रक्षण कार्य, पण मला लोकांची मानसिकता बदलायची आहे, कारण अजूनही माणसं प्राण्यांना किंवा पक्ष्यांना, माणसांच्या नजरेने मुळात बघतच नाहीत, त्यांच्या वेदना समजून घ्यायचा प्रयत्न करत नाहीत. ज्या दिवशी प्रत्येकाचा यांच्याकडे बघायचा दृष्टिकोन बदलेल, त्या दिवशी चित्रच काही वेगळं असेल. मग बऱ्याच साऱ्या माध्यमांतून आम्ही लोकांमध्ये जनजागृती करायचा प्रयत्न करतो."

हे सर्व उपक्रम पाहिले की वाटते, पशुपक्ष्यांच्या सेवेचा सर्वतोपरी विचार करून संस्था कार्यरत आहे. संस्थेच्या कार्यालयाची धारणाशक्ती ही पाचशे पक्ष्यांची असून, संस्थेत चाळीस कुत्रे राहू शकतात. सध्या इथे दीडशे पक्षी असून पंचवीस कुत्र्यांवर उपचार चालू आहेत. दिवसातून सरासरी आठ फोन प्राण्यांच्या बचावासाठी यांच्याकडे येतात. मग मी कुतूहलाने विचारलं, जर मोठ्या प्राण्यांसाठी म्हणजेच एखाद्या जखमी गायीसाठी फोन आला तर तुम्ही त्यांना कुठे ठेवता? यावर त्यांनी सांगितले, "मोठ्या घायाळ प्राण्यांना म्हणजेच गाय, गाढवं,घोडा यांना ते कर्नाळा येथील 'हॅन्ड्स दॅट हिल' या संस्थेत दाखल करून त्यांच्यावर उपचार तिथेच केले जातात."

.काही गोष्टी आपले संस्कृती, संस्कार शिकवतात आणि यातली महत्त्वाची शिकवण म्हणजे प्राणीमात्रांवर दया. इतकंच सांगेन, जगा आणि जगू दया...मग हे जग सुंदर आहेच. आपल्या मुलांना प्राण्यांविषयी विशेष लळा लहानपणापासून लावा. कोणत्याही संस्थेत जाऊन तिथल्या प्राण्यांना खाऊ घाला. बघा, किती बरं वाटेल.जास्त नाही हो, याला दोन ते तीन हजार खर्च येईल पण त्या मुक्या जिवांना थोडं का होईना, तुम्हांला समजून घेता येईल."

# युवकांना रोजगार संधीसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म !

रत्नागिरीमध्ये अनेक प्रकारच्या सेवा लोकांना सहज उपलब्ध होत नाहीत. तरुणांकडे कौशल्य आहे; पण त्यांना संधी मिळत नाही. त्यांचे कौशल्य सर्व रत्नागिरीवासियांना एकाच ठिकाणी कळले, तर त्यातून सहज रोजगार संधी मिळू शकतात. या अनुषंगाने मागील २ वर्षे अभ्यास करून 'अनबॉक्स सर्व्हिसेस' हा डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध केला आहे. १ मे या दिवशी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या मुहूर्तावर याचा प्रारंभ झाला आहे, अशी माहिती युवा उद्योजक श्री. गौरांग आगाशे यांनी दिली. 'अनबॉक्स युअर डिझायर ॲप'द्वारे गेली ५ वर्षे रत्नागिरीमध्ये खाद्यपदार्थ वितरण, किराणा माल, औषधे, प्लास्टिक आणि ई-वेस्ट गोळा करण्यात येते. या माध्यमातून ५० तरुणांना रोजगार उपलब्ध झाला; परंतु अनेक प्रकारच्या सेवा एकाच मंचावर उपलब्ध नसल्याने तरुणांना रोजगारासाठी रत्नागिरी सोडून बाहेरगावी जावे लागते.कौशल्य विकास अभ्यासक्रम, आयटीआय, शासकीय तंत्रनिकेतन यामधून कौशल्यवान होणाऱ्या विद्यार्थ्यांना कौशल्याधारित रोजगाराची आवश्यकता आहे. त्याकरता डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला आहे.



या प्लॅटफॉर्मद्वारे खात्रीशीर आणि वेळेमध्ये सेवा मिळू शकतात. याकरता २ वर्षे सर्वेक्षण तसेच अनेक व्यक्तींना भेटून समस्या काय ? आणि त्यावरील उपाय काय ? असा अभ्यास करण्यात आला. अगदी रिक्शावालासुद्धा यात सहभागी होऊ शकतो.

**शून्यातून विश्व**

अनबॉक्सने आतापर्यंत स्थानिकांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच 'अनबॉक्स सर्व्हिसेस-प्रोव्हायडिंग सोल्युशन्स' हे ॲपसुद्धा स्थानिक आयटी कंपनी आर्यक सोल्युशनचे प्रशांत आचार्य आणि ऋषिकेश सरपोतदार यांनी साकारले आहे.पूर्वी 'यलो पेजेस' टेलिफोन सूची असायची. त्यामध्ये सर्व व्यावसायिक आवश्यक संपर्क नंबर असायचे. काळाच्या ओघात हे सर्व मागे पडले. आजकाल एखादा नंबर लगेच मिळत नाही. ही आवश्यकता लक्षात घेऊन समाजाचेही आपण काही देणं लागतो, या भावनेने 'अनबॉक्स साथी' हा विभाग तेथे असेल. त्यात महत्त्वाचे नंबर्स विनामूल्य देणार आहोत. अनबॉक्स साथी'च्या माध्यमातून वाशिंग मशीन आणि एसी दुरुस्ती,इलेकटीश्न,प्लंबर, फर्निचर,पौराहित्य,होम क्लीनिग,ड्रायवर,गाडी भाड्याने मिळणे,फाब्रीकेषण,वादक,इव्हेंटमनेजर,फोटोग्राफर्स,लायटिंग आदी सेवा देखील या माध्यमातून दिल्या जाणार आहेत. प्रवासी सेवा,वास्तुविक्री,कुरिअरआणि खानपान सेवा अशा सेवा त्वरित उपलब्ध करून देणारा हा उपक्रम खरोखरच गौरांगणे तरुणांना नवीन व्यावसायिक संधीसाठीच निर्माण केला आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे ८ जणांचा मृत्यू

**इंदूर, दि. ३१ वृत्तसंस्था**

देशातील सर्वात स्वच्छ शहरांपैकी एक असलेल्या इंदूरमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. गेल्या काही दिवसांपासून दूषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर या दूषित पाण्यामुळे १००० हून अधिक लोकांना पोटदुखी आणि उलट्या-जुलाबांचा त्रास होत आहे. इंदूर शहरामध्ये नर्मदा नदीमधून येणारं पाणी हे आजार आणि मृत्यूचं कारण ठरत असल्याचं समोर आलं आहे. आता खबरदारीचा उपाय म्हणून महानगरपालिकेने प्रभावित भागातील पाणीपुरवठा बंद केला आहे. तसेच जलवाहिनीची दुरुस्ती केली जात असून, टँकरमधून स्वच्छ पाणी पुरवलं जात आहे. तसेच आरोग्य विभागाची पथके घरोघरी जाऊन रुग्णांची तपासणी करत आहे.

दूषित पाणीपुरवठ्यामुळे ही घटना घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेने त्वरित तपास सुरू केला. त्यानंतर भागिरथपुरा पोलीस



चौकीच्या टॉयलेटखालून जाणाऱ्या नर्मदेच्या जलवाहिनीला गळती लागली होती. तसेच या गळतीमुळे दूषित पाणी जलवाहिनीमध्ये मिसळत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संपूर्ण प्रभागात दूषित पाण्याचा पुरवठा होत होता. तसेच हे दूषित पाणी पिऊन लोक आजारी पडत होते.

दरम्यान, दूषित पाण्याचे प्राशन केल्याने तब्येत बिघडून आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याने इंदूरमधील भागिरथपूरामध्ये खळबळ उडाली आहे. या भागातून सातत्याने नवनवे रुग्ण समोर येत आहेत. तसेच अत्यवस्थ असलेल्या रुग्णांना प्राथमिक उपचार करून पुढील उपचारांसाठी मोठ्या रुग्णालयात पाठवले जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून नर्मदा नदीच्या पाण्याचा वापर करू नका, असं आवाहन करणाऱ्या पोस्ट येथील सोशल मीडियावरून लोक शेअर करत होते. मात्र लोकांच्या तक्रारींकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने दुर्लक्ष केले. या दूषित पाण्यामुळे आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. मात्र अधिकृत आकडा ३ असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दूषित पाण्यामुळे नेमका किती जणांचा मृत्यू झाला, याबाबच संशय व्यक्त केला जात आहे. दुषित पाण्यामुळे आतापर्यंत ११०० हून अधिक लोकांना उलट्या-जुलाब, पोटदुखीचा त्रास होत आहे. तर १११ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# हिंदू तरुणांनी टिकून राहण्यासाठी आयसिससारखी संघटना स्थापन करावी
## यति नरसिंहानंद गिरी यांचे वादग्रस्त विधान

**गाझियाबाद, दि. ३१ वृत्तसंस्था**

शिवशक्ती धाम दासना आणि श्री पंचदशनम जुना आखाड्याचे महामंडलेश्वर यांचे मुख्य पुजारी यती नरसिंहानंद गिरी यांनी एक व्हिडिओ जारी केला आहे. ज्यामध्ये त्यांनी हिंदू रक्षा दलाच्या अध्यक्षा पिंकी चौधरी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी तलवारी वाटल्याचे समर्थन केले. हे समर्थन करताना त्यांनी,"अशी शस्त्रे वाटली गेली पाहिजेत जी इस्लामिक जिहादींपेक्षा चांगली होती."असे म्हटले आहे. तसेच इस्लामिक जिहादींना अधिक योग्य असलेली शस्त्रे वाटली पाहिजेत असे म्हणत त्यांनी वादग्रस्त विधान केले आहे.

यती नरसिंहानंद यांनी बांगलादेशातील निष्पाप हिंदूंच्या हत्याकांडाचे कारण हिंदू समुदायातील व्यापक नैराश्याला दिले आहे. याविषयी बोलताना त्यांनी, सोशल मीडियाद्वारे उघड झालेल्या बांगलादेशातील हिंदूंच्या क्रूर हत्याकांडांनी संपूर्ण हिंदू समुदायाला भयभीत आणि निराश केले आहे," असे त्यांनी म्हटले आहे.

बांगलादेशात आणि त्यापूर्वी पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात अशा प्रकारे लाखो निष्पाप हिंदूंची हत्या करण्यात आली आहे. या घटनांविरुद्ध जगभरात कोणताही ठोस निषेध झालेला नाही. भारतात अशा घटना घडू नयेत या चिंतेतून, पिंकी चौधरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हिंदू समुदायात तलवारी वाटल्या आहेत.

# गोवंश तस्करांच्या टोळी विरुद्ध मोका
## राज्यात पहिली कारवाई

**नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी**

गोवंश तसेच गोमांसाची वाहतूक करणाऱ्या १२ जणांच्या तस्करांच्या टोळीवर नागपूर ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) कारवाई केल्याने गोवंश तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. राज्यात या प्रकारची ही पहिलीच कारवाई आहे.

महाराष्ट्रात गोवंश तसेच गोमांसाची वाहतूक करताना आढळल्यास संबंधितावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) लावण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती.

नागपूर ग्रामीणमध्ये कळमेश्वर पोलिस ठाण्यात १६ नोव्हेंबर २०२५ रोजी डायल ११२ वर फेटरी येथे नागपूर ते काटोल रोडवर एका ट्रकला आग लागल्याची माहिती मिळाली. कळमेश्वर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता एक ट्रक जळतांना दिसला तर चालक पसार होता. पोलिसांनी अग्निशमन दलास बोलावून ही आग विझविली. वाहनाची तपासणी केली असता आत गोवंश होते. त्यांना दोरखंडाने बांधून निर्दयतेने आत कोंबलेले होते. ३७ पैकी २९ जनावरे आगीत होरपळून मृत्यूमुखी पडली. बचावलेल्या ८ गोवंशाला राउळगाव येथील जैन गोशाळेत दाखल करण्यात आले.

तपासात हा गुन्हा संघटितरित्या केल्याचे स्पष्ट झाले. आरोपी टोळी प्रमुख मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी, वाहन चालक सैयद सुल्तान उर्फ सोनू हमीद अली, आमीर रउफ कुरेशी, रफीक कुरेशी शेख सत्तार कुरेशी, जनावरे खरेदी-विक्री करून वाहतूक करणारा वाहन चालक-मालक शोहेब नौशाद सैयद, मनोहर भोजराज मनगटे, इख्तियार कुरेशी मुश्ताक कुरेशी याच्यासह पाच फरार आरोपींविरूद्ध मोक्का लावण्यात आला आहे. जनावर वाहतुकीसाठी टोळी प्रमुख मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी याच्याकडे ट्रक आहे.

# भारत-पाकिस्तान संघर्षामध्ये मध्यस्थी केल्याचा चीनचा दावा

**नवी दिल्ली, दि. ३१ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उध्वस्त केले होते. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष पेटला होता. हा संघर्ष संपवण्यात मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. मात्र भारताने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला. दरम्यान यानंतर आता चीनने देखील आपण भारत आणि पाकिस्तान यांच्यात या संघर्षाच्या काळात मध्यस्थी केल्याचा दावा केला आहे. भारताने चीनचा दावा देखील पूर्णपणे फेटाळून लावला असून शस्त्रविरामाच्या निर्णयामध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप नव्हता, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

ऑपरेशन सिंदूर नंतर १० मे रोजी दोन्ही देशांच्या डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स (DGMO) मध्ये थेट चर्चा झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविराम जाहीर करण्यात आला, असे भारताकडून वारंवार सांगण्यात आले आहे.

"आम्ही यापूर्वीच असे दावे फेटाळले आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय मुद्द्यावर तिसऱ्या पक्षाची कसलीही भूमिका नाही. दोन देशांच्या डीजीएमओमध्ये झालेल्या थेट चर्चेनंतर शस्त्रविरामावर एकमत झाले, ही आपली भूमिका यापूर्वीही अनेकदा स्पष्ट करण्यात आलेली आहे," असे सूत्रांनी सांगितले.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. **Group Editor-in-Chief and Director - Shrikrishna Tansukhdas Chandak**, Group Editor - **Sandeep Ramrao Kale,** Managing Editor - **Pankaj Shrikrishna Chandak**, Resident Editor - **Gajanan Tupe**

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. समूह मुख्य संपादक व संचालक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३), समूह संपादक - संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक - पंकज श्रीकृष्ण चांडक निवासी संपादक - गजानन तुपे Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101